## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११० बुधवार, दि. ११ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

# 'राष्ट्रवादी'ने आखली रणनीती

## नव्या नेतृत्वाला संधी देणार : पवार



जनता आवाज वृत्तसेवा

**पुणे : पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६ वा वर्धापनदिन कार्यक्रम पार पडला. यावेळी अनेक प्रमुख नेत्यांनी भाषण करत शरद पवार यांच्याविषयी तसेच पक्षाच्या संघर्षाविषयी भाष्य केलं. त्यानंतर शरद पवारांनी पक्षातील नेतृत्व बदलावर देखील मोठे विधान केले आहे. निवडणुकीनंतर नव्या नेतृत्वाला संधी देणार असल्याचं शरद पवारांनी म्हटलं आहे.**

> देशाचा विचार दोन दृष्टिने केला पाहिजे. देशाचा विचार करताना राष्ट्रवादी कधी राजकारण आणत नाही. पहलगाममध्ये हत्या झाल्यानंतर राष्ट्रवादीने देशहिताची भूमिका घेतली. शेजारी राष्ट्रासोबत आपले संबंध चांगले राहिले नाही. सुसंवादाची परिस्थिती बांगलादेश, श्रीलंका, चीन, पाकिस्तानसोबत नाही.
> **- शरद पवार**

शरद पवार म्हणाले, २६ वर्षांपूर्वी आपण एकत्र आलो आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापन करण्याचा निर्णय घेतला. जनतेचा प्रचंड मेळावा आणि पक्षाला उभारी आली. थोड्या दिवसातच महाराष्ट्राचा कारभार करण्यासाठी राष्ट्रवादीच्या सहकाऱ्यांना सामान्य जनतेने संधी दिली. लोकांची सेवा करायची संधी दिली. सामान्य माणसाला संधी दिली तर तोही कर्तृत्व दाखवू शकतो आणि राज्य चालवू शकतो. नावं घ्यायला अनेकांची नावं आहेत. जयंत पाटलांनी अर्थमंत्री म्हणून १० वर्षं काम केलं आहे.

पुढे पक्षनेतृत्वावर देखील शरद पवारांनी भाष्य केलं आहे. ते म्हणाले, प्रमुख सहकाऱ्यांना सोबत घेऊन चर्चा करणार. राष्ट्रवादी पक्षाने सामान्य माणसाला संधी दिली आहे. निवडणुकीनंतर नव्या नेतृत्वाला संधी देणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. तसेच ५० टक्के महिलांना निवडून द्या, असे आवाहन देखील शरद पवारांनी केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

पान ४



**अजित पवारांच्या राष्ट्रवादीने बालेवाडीत वर्धापन दिन साजरा केला. यावेळी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी निधी वाटपावरील आरोप, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या रणनीतीवरही भाष्य केले. काही जण म्हणतात, मी सामाजिक न्याय विभागावर अन्याय केला, अरे पण मी माझ्या खिशातले पैसे देतो का?, असा सवाल करत मंत्री संजय शिरसाट यांना अजित पवार यांनी घरचा आहेर दिला.**

अजित पवार यांनी २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंड पुकारून भाजपसोबत सरकारमध्ये दाखल झाले. त्यांच्या भाजपासोबत जाण्याच्या या निर्णयावर अनेकजण आक्षेप घेतात. भाजप आणि राष्ट्रवादीचा वैचारिक भूमिका वेगळी आहे, असे असूनही अजित पवार यांनी भाजपासोबत जाण्याचा निर्णय का घेतला? असा सवाल उपस्थित केला जातो. आजच्या वर्धापन दिन मेळाव्यात त्यांनी याच प्रश्नाचे थेट आणि जाहीर उत्तर दिले आहे. राज्याचा विकास, राज्यातील शेवटच्या माणसाचा विकास हाच मुख्य हेतू होता, असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

मला काहीजण विचारतात की तुम्ही भाजपसोबत का गेले? आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २०१९ साली शिवसेनेसोबत गेला होता. आपण शिवसेनेसोबत सरकार स्थापन केले होते. त्यावेळी आपण काही तडजोडी केल्या होत्या. फक्त विरोधीपक्षात बसून, मोर्चे काढून, आंदोलन करून चालत नाही, असे स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिले. आपण काही साधूसंत नाही. आपण लोकांना दिशा दाखवणारे, लोकांचे प्रश्न सोडवणारे आणि त्यातून बेरजेचे राजकारण करणारे आपण लोक आहोत.

# कुणाचाही बाप काढणे योग्य नाही : मुख्यमंत्री

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई** : भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी धाराशिव येथे संवाद मेळाव्यात केलेल्या भाषणात, स्थानिक शिवसेना नेत्यांना उद्देशून 'भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप बसलेला आहे,' असे विधान केले होते. या वक्तव्याचे महायुतीत तीव्र पडसाद उमटले असून, शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीतही यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यानंतर तुमच्या मनात काहीही असेल, पण कुणाचाही बाप काढणे योग्य नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणे यांना खडसावले.

नितेश राणे यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वारंवार अडचणींचा सामना करावा लागत आहे. धार्मिक तेढ निर्माण करणारी विधाने केल्यामुळे आणि नागपूर येथील हिंसाचारानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश राणे यांना समज दिली होती. धाराशीव येथील मेळाव्यातील वक्तव्याचे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत पडसाद उमटल्याचे पाहायला

पान ४



### दोन्ही नेत्यांनी त्यांच्या पोस्ट केल्या डिलीट

नितेश राणे यांनी धाराशिवमध्ये केलेल्या वक्तव्यामुळे शिंदे गटाचे आ. नीलेश राणे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली. 'नितेशने जपून बोलावे.. मी भेटल्यावर बोलेनच परंतु, बोलताना भान ठेवून बोलले पाहिजे, असे या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले होते. यावर नितेश राणे यांनी देखील जशास तसे प्रत्युत्तर देत निलेश राणेंना उद्देशून म्हणाले, निलेशजी तुम्ही टॅक्स फ्री आहात. या पोस्ट्सची समाजमाध्यमे आणि प्रसारमाध्यमांवर चर्चा सुरू झाल्यानंतर काही वेळाने दोन्ही नेत्यांनी त्यांच्या पोस्ट डिलीट केल्या.

# सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती द्या

## मंत्रालयातील आढावा बैठकीत जलसंपदा मंत्री विखेंच्या सूचना

जनता आवाज वृत्तसेवा

**लोणी** : अकोले व संगमनेर तालुक्यातील सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती द्यावी. या दोन्ही तालुक्यातील सिंचन क्षेत्र वाढावे यासाठी सिंचन प्रकल्प व योजनांच्या कामांचे सर्व्हेक्षण करून या बाबतचा सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल दिल्या.



जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अकोले मतदारसंघातील जलसंपदा विभागातील विकास कामे आणि संगमनेर तालुक्यातील साकुर व पठार भागातील जलनियोजन संदर्भात मंत्रालयात बैठक झाली.

बैठकीस आ. डॉ. किरण लहामटे, आ. अमोल खताळ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, गोदावरी खोरे विकास

पान ४

# आ. जगतापांच्या सूचनेनुसार केडगावात स्वच्छता

## भाग्योदय मंगल कार्यालय नागरिकांसाठी खुले होणार : आयुक्त यशवंत डांगे

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर** : महानगर पालिकेच्या केडगाव येथील भाग्योदय मंगल कार्यालयाची दुरावस्था झाली आहे. कोविड काळापासून ते बंद अवस्थेत आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. आमदार संग्राम जगताप यांनी हे कार्यालय पुन्हा नागरिकांसाठी खुले होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मंगळवारी महानगरपालिकेने स्वच्छता अभियान राबवून हे कार्यालय स्वच्छ केले.

तेथील किरकोळ दुरुस्तीची कामे करून लवकरच हे कार्यालय नागरिकांसाठी खुले करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.




कोविड काळापासून भाग्योदय मंगल कार्यालय बंद अवस्थेत आहे. तेथे विद्युतीकरण व काही दुरुस्तीची कामे प्रलंबित आहेत. तसेच, तेथे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता होती. तेथील नागरिकांनी कार्यालय पुन्हा सुरू करण्याची मागणी आ. जगताप यांच्याकडे केली आहे. त्यांच्या सूचनेनुसार या कार्यालयाच्या स्वच्छतेसाठी मंगळवारी अभियान राबविण्यात आले. तेथील सर्व प्रकारचा कचरा उचलून स्वच्छता करण्यात आली. तसेच, जेटिंग मशिनच्या माध्यमातून संपूर्ण कार्यालय धुवून स्वच्छ करण्यात आले आहे.

### कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी खुले करणार

कार्यालयाचे शटर, विद्युतीकरण व इतर किरकोळ दुरुस्त्या करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. लवकरच हे कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी खुले करण्यात येईल, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

# भाजपा वाढीसाठी काम करा : विवेक कोल्हे



जनता आवाज वृत्तसेवा

**कोपरगाव** : काकडी येथील अर्जुन गुंजाळ, संदीप गुंजाळ तसेच साखरबाई विश्वनाथ सोनवणे यांचा युवानेते विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

या महत्त्वपूर्ण प्रवेशामुळे आगामी काळात काकडी गावाच्या विकासासाठी आणि पक्षाची ताकद वाढवण्यासाठी एक नवा पाऊल टाकले गेले आहे. याप्रसंगी, विवेक कोल्हे यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन, पुढील वाटचालीसाठी काकडी गावाच्या समृद्धीसाठी योगदान देण्याची शुभेच्छा व्यक्त करत जोमाने संघटना वाढीसाठी काम सुरू करावे. कारण काही काळ जरी कुणी दिशाभूल केली असेल तरी तुम्ही पुन्हा योग्य ठिकाणी आलेला आहात. त्यामुळे निश्चितच आगामी काळात अधिक सक्षमपणे वातावरण दिसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी चंद्रभान गुंजाळ, साई संजीवनी सह. बँकेचे संचालक नानासाहेब गव्हाणे, उपसरपंच भाऊसाहेब सोनवणे, बाबासाहेब सोनवणे, राजेंद्र भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

गुंजाळ कुटुंबाने बिपीन कोल्हे, मा. आ. स्नेहलता कोल्हे, युवानेते विवेक कोल्हे यांनी नेहमी जनतेच्या विकासाचा विचार केला आहे. पुन्हा आमच्यावर विश्वास दाखवला आहे. गेले काही काळ मात्र आम्ही जिथे गेलो होतो, तिथे अतिशय दिशाभूल करणारा कारभार आणि अक्षरशः निराशाजन्य स्थिती आहे. काळे गटात गेल्यानंतर आमचा काहीच दिवसात भ्रम निरास झाला आहे. त्यामुळे आम्ही पुन्हा निर्णय घेत भाजपात प्रवेश करतांना 'आम्ही पुन्हा आमच्या घरी परतलो आहोत', अशी भावना व्यक्त केली.

### पुन्हा घरवापसी

काकडी येथील ज्येष्ठ कार्यकर्ते भीमराज गुंजाळ, त्यांचे दोन्ही मुले अर्जुन गुंजाळ आणि संदीप गुंजाळ तसेच साखरबाई विश्वनाथ सोनवणे यांनी काही महिन्यांपूर्वी काळे गटात प्रवेश केला होता. त्यांनी सहकार महर्षी कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या उपस्थितीत पुन्हा माघारी परतून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

# मनसेचा रेल्वे प्रशासनावर धडक मोर्चा



जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई** : मुंब्रा रेल दुर्घटनेनंतर राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ठाण्यातील गाव देवी मैदान येथे रेल्वे प्रशासनावर धडक मोर्चा काढण्यात आला. मोर्चात नेते, स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते. मुंब्रा रेल्वे दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला असून अनेक गंभीर जखमी झाले आहेत. यात रेल्वे प्रोटोकॉल मधील त्रुटी आणि चालढकल पणा कारणीभूत असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

या संदर्भात राज ठाकरे आणि मनसेने ठाण्यापासून मुंब्रा रेल्वे प्रशासनावर आरोप आणि जबाबदारीची मागणी केली आहे. मोर्चा गाव देवी मैदानापासून सुरु होऊन ठाणे स्टेशनपर्यंत पोहोचला. रेल्वे प्रशासनास अति गर्दी नियंत्रण आणि रुळांवर सुरक्षिततेसाठी कदम उचलण्याचा इशारा या वेळी देण्यात आला. तसेच या अपघातात, मृतांच्या कुटुंबांना न्याय मिळावा अशी मागणी देखील करण्यात आली. या अपघातात अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला, पण अशाच घटना रोज मुंबईत घडत आहेत. मुंबईत रोज प्रवासी जखमी होत आहेत आणि तरीही कोणाला काहीही देणं-घेणं नाहीये. मुंबई रेल्वेसाठी एक वेगळं

पान ४

### रेल्वे अपघात झाला तो दुर्दैवी

मनसे नेते अविनाश जाधव यांनी रेल्वे प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. आताच सुरक्षेत सुधारणा केली नाही, तर आंदोलन तीव्र करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मुंबईत जो रेल्वे अपघात झाला तो दुर्दैवी आहे.

# महिलांनो, स्वबळावर उभे रहा: सौ. विखे

## पेमगिरीत शालिनीताई विखे पाटील व निलम खताळ यांनी घेतले सात फेरे

जनता आवाज वृत्तसेवा

**संगमनेर : प्रत्येक महिलेच्या अंगी काही ना काही विशेष गुण असतात. त्या गुणांचा उपयोग करून महिलांनी स्वतःला सक्षम करावे, तसेच आलेल्या प्रत्येक संधीच सोनं करावे. महिला बचत गटांच्या माध्यमातून सर्वच महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभारून स्वबळावर उभे राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.**



संगमनेर तालुक्यातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या पेमगिरी येथील महाकाय वटवृक्षाच्या सानिध्यात वटपोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जाकमत बाबा तरुण मित्र मंडळ आणि संगमनेर तालुका महायुती महिला आघाडीच्या वतीने खास महिलांसाठी उत्सव माझ्या कुंकवाचा वटसावित्री पौर्णिमेचा या महिलांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

> महिलांच्या दृष्टीने वट पौर्णिमा हा सण महत्वाचा आहे. जसे हा वड वाढत गेला. तसेच या तालुक्यातील सर्व लाडक्या बहिणींनी एकत्रित येऊन परिवर्तन केले. त्यामुळे तुमच्या पाठीमागे मी व तुमचे भाऊ भक्कम उभे राहतील, असा विश्वास आ. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर आ. खताळ यांच्या मातोश्री मंगल खताळ, पत्नी नीलम खताळ, सुनिता कानवडे, वर्षा डुबे यांच्यासह अनेक महिला मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी जाकमत बाबा तरुण मित्र मंडळाच्या सर्व तरुणांनी विशेष परिश्रम घेतले.

पान ४

### सर्व महिलांनी वटवृक्षाचे संवर्धन करावे : विखे

शालिनीताई विखे पाटील, मंगल खताळ, नीलम खताळ यांच्यासह उपस्थित महिलांनी महाकाय वटवृक्षाची पूजा करून सर्व महिलांच्या बरोबरीने सात फेरे मारले आणि या वटसावित्री पौर्णिमेनिमित्त प्रत्येक महिलेला वडाचे रोप भेट देण्यात येणार आहे. त्या वडाच्या रोपाचे घरी रोपण करावे. त्यामुळे वटवृक्षाचे संवर्धन करावे, असे आवाहन जि. प. माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

### सैनिक पत्नींचा वृक्षाचे रोपे देवून सन्मान

भारत मातेचे रक्षण करणाऱ्या सैनिक पत्नी वैष्णवी उपरे, निलम कासार, वर्षा प्रतीक्षा दीक्षित, सविता दत्ता कासार, मनोली नवले या सैनिक पत्नींचा तसेच बिबट्याच्या तावडीतून आपल्या मुलाला वाचविले म्हणून कविता खताळ यांचा वट वृक्ष देऊन सन्मान केला. महिला पोलीस अनिता गुंजाळ, मीरा बिबवे, सविता सोळशे, शशीकला हांडे, शिला साबळे, सुवर्णा नवले, लता जाधव, सुषमा भांगरे, सविता रुपवते, प्रतिभा थोरात, लता जाधव, निशा धाडी, सुवर्णा नवले, माधुरी मुंडलिक या महिला कर्मचाऱ्यांचा मान्यवर महिलांच्या हस्ते वडाचे रोप देऊन सन्मान करण्यात आला.

## संमिश्र

### ऑस्ट्रियाच्या ग्राझ शाळेत गोळीबार

जनता आवाज वृत्तसेवा

**व्हिएन्ना** : काल मंगळवारी सकाळी ऑस्ट्रियातील ग्राझ शहरातील एका हायस्कूलमध्ये गोळीबाराची घटना घडली. यामध्ये किमान ११ जणांचा मृत्यू झाला आणि २८ जण जखमी झाले. त्यापैकी किमान चार जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. काही जणांच्या डोक्यातही गोळ्या लागल्या आहेत. पोलिसांनी परिसरात मोठी कारवाई सुरू केली आहे आणि लोकांना दूर राहण्यास सांगण्यात आले आहे. ऑस्ट्रियन मीडियाच्या वृत्तानुसार, सकाळी १० वाजता बोर्ग ड्रेयर्सचुट्झेंगासे हायस्कूलमध्ये गोळीबाराचा आवाज ऐकू आला.

### पुणे-अक्कलकोट मार्गावर अपघात

जनता आवाज वृत्तसेवा

**सोलापूर** : पुणे येथून अक्कलकोटला देवदर्शनासाठी गेलेल्या भाविकांच्या चारचाकी वाहनाचा अपघात झाला आहे. कर्जळ येथे झालेल्या या अपघातात १ ते २ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अधिक तपास सुरू असून, मृतांच्या ओळखी आणि इतर तपशील लवकरच उघड होतील.अक्कलकोट आणि कर्जळ परिसरात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांनी उपाययोजना केल्या आहेत. अपघाताची कारणे आणि इतर तपशील तपासले जात आहेत.

### मद्यप्रेमींच्या खिशाला बसणार झळ!

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई** : काही दिवसांपूर्वी देशात बिअरचे दर कमी होतील अशा बातम्यांमुळे मद्य प्रेमींना आनंद झाला होता. मात्र, आता राज्य सरकारने उत्पादन वाढवण्याच्या दृष्टिकोनातून दारूविक्रीवरील कर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मद्यप्रेमींच्या खिशाला मोठी झळ बसणार असून, त्यांचं सेलिब्रेशनही महागणार आहे.

### दिल्लीत इमारतीला लागली भीषण आग

जनता आवाज वृत्तसेवा

**नवी दिल्ली** : काल मंगळवारी सकाळी दिल्लीतील द्वारका सेक्टर-१३ येथील शब्द अपार्टमेंटच्या सातव्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये आग लागली. एक वडील त्याच्या दोन मुलांसह फ्लॅटमध्ये अडकले. स्वतःला वाचवण्यासाठी, दोन्ही १० वर्षांच्या मुलांनी बाल्कनीतून उडी मारली. त्यांचे वडील यश यादव (३५) यांनीही त्यांच्यासोबत उडी मारली.



# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** बहुजन शिक्षण संघ, अहमदनगर संचलित पाथर्डी येथील मिलिंद विद्यार्थी वसतीगृहाने चालू शैक्षणिक वर्षांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशासाठी आवाहन केले आहे.

शिक्षणापासून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेल्या सात दशकांपासून कार्यरत असलेल्या या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त ड. संघराजजी रूपवते, कार्यकारी रजिस्ट्रार राजेंद्र एडके आणि वसतीगृहाचे अधीक्षक सुंदरदास कांबळे यांनी हे आवाहन केले आहे. शैक्षणिक सुविधांसह सर्वांगीण विकास १९५० पासून बहुजन शिक्षण संघ अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत आहे. मिलिंद विद्यार्थी वसतीगृहात इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. यासोबतच शासन निर्णयानुसार विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. वसतीगृहात विद्यार्थ्यांना दैनंदिन सर्व सुविधा पुरवले जाते. याशिवाय सुसज्ज ग्रंथालय, शुद्ध फिल्टर पाणी, आणि सीसीटीव्ही निगराणीखाली सुरक्षित वातावरण यासारख्या सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य आणि मार्गदर्शनवसतीगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक साहित्य मोफत दिले जाते.

# वटसावित्री पौर्णिमेनिमित्त २५२५ वटवृक्षांचे रोपण

## दंडकारण्य अभियानांतर्गत प्रत्येक वाडी, वस्ती व गावात ५ वटवृक्षांचे रोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** थोर स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनासाठी सुरू झालेल्या दंडकारण्य अभियानांतर्गत वटसावित्री पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील १७१ गावे २५८ वाड्या व विविध वस्त्यांवर महिला भगिनींनी मोठ्या आनंदात व उत्साहात २५२५ वटवृक्षांचे रोपण व पूजन करून वृक्ष संवर्धनाचा मंत्र राज्याला दिला आहे.

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात व आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दंडकारण्य अभियान समिती व अमृत उद्योग समूह यांच्या सहकार्याने



आणि नागरिकांच्या सहभागातून दंडकारण्य अभियान ही पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ बनली आहे.

प्रकल्पप्रमुख दुर्गाताई तांबे व कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली यावर्षी तालुक्यातील १७१ गावे २५८ वाड्या व विविध वस्त्यांवर २५२५ वटवृक्षांचे रोपण व पूजन महिलांनी केली असून या वटवृक्षाच्या संवर्धनाची जबाबदारी स्थानिक महिलांनी उचलली आहे.

यावेळी विविध गावांमध्ये निर्मलाताई गुंजाळ, अर्चनाताई बालोडे, प्रमिलाताई अभंग, मंदाताई सोनवणे, दिप्ती सांगळे, प्रीती फटांगरे, भाग्यश्री नरवडे, बेबीताई थोरात, मीनाक्षी थोरात, ममता गुंजाळ, पद्मा थोरात, शकुंतला सोसे, शितल उगलमुगले, मीरा शेटे, नंदाताई खेमनर, प्रतिभा जोंधळे, निशाताई कोकणे, लताताई गायकर, अनिता सोनवणे यांच्यासह स्थानिक महिलांनी मोठ्या उत्साहाने वटवृक्षाची पूजन केले.

यावेळी काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष अर्चनाताई बालोडे, निर्मलाताई गुंजाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

खरे तर या चांगल्या सणांमध्ये राजकारण नको आहे मात्र सत्ताधारी महायुती व भाजपचे कार्यकर्ते राजकारण करत आहेत की दुर्दैवी असल्याची भावना तालुक्यातील असंख्य महिलांनी बोलून दाखवली.

### वटवृक्ष हा ऑक्सिजन देणारा वृक्ष : डॉ. थोरात

तीन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनामुळे ऑक्सिजनचे महत्त्व प्रत्येकाला कळाले. आपल्याला आयुष्यभर मोफत ऑक्सिजन देणारे हे वृक्ष आहेत. त्यामध्ये वटवृक्ष, पिंपळ, उंबर, कडुलिंब हे सर्वाधिक ऑक्सिजन देणारे असल्याने त्यांना आपण देव वृक्ष म्हणून संबोधतो. प्रत्येक महिलेने मुलांप्रमाणे वृक्षांची काळजी घेतली तर पर्यावरणाचा मोठा धोका आपण टाळू शकतो. वटवृक्षाला ऐतिहासिक दर्जा मिळावा यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा सुरू असल्याचे डॉ. जयश्री थोरात यांनी म्हटले आहे.

### वृक्ष संवर्धन चळवळीत महिलांचा सहभाग : सौ. तांबे

भारतीय संस्कृतीमध्ये वटसावित्री पौर्णिमेला मोठे महत्त्व असून वड हा दीर्घायुष्य वृक्ष आहे तो मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन देत असून आध्यात्मिक आणि शास्त्रीय असे दोन्ही कारण वट पूजेसाठी आहेत. प्रत्येक घराच्या भोवताली वृक्षांसह परसबागा निर्माण झाले वृक्ष संवर्धन चळवळीमध्ये महिलांचे मोठे योगदान असून प्रत्येक महिलेने दरवर्षी किमान दोन वृक्षांचे रोपण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# दिव्यांगांचा निधी न देणाऱ्यांवर कारवाई करा

## भाजपा दिव्यांग विकास आघाडीची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील बऱ्याच ग्रामपंचायतीनी आजतागायत, आपल्या गावातील दिव्यांग बंधू व भगिनीं यांचा हक्काचा असणारा ५ टक्के निधी वाटप केला नाही. तसेचं जाणून बुजून वाटप करण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. तरी ग्राम पंचायतने १५ ऑगस्ट पूर्वी दिव्यांगांचे सर्वेक्षण करून त्यांच्या हक्काचा ५ टक्के निधीचे वाटप करावे, अन्यथा जिल्हा परीषद समोर आमरण उपोषण केले जाईल, असा इशारा भाजपा दिव्यांग विकास आघाडीच्या



शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याकडे निवेदनाद्वारे दिला.

तसेच ग्रामपंचायतीने दिव्यांगांच्या ५ टक्के निधीचे वाटप न केल्यास सरपंच ग्रामसेवकवर हक्कभंगाची कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केली. यावेळी महिला जिल्हा अध्यक्ष आशाताई गायकवाड,नगर तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, उपाध्यक्ष संदीप शेंडकर, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब धिवर इत्यादी उपस्थित होते.

प्रत्यक्षात दिव्यांगाना न ग्रामीणभागत आजही कोणत्याही प्रकारचा मान सन्मान मिळत नसल्याचे जाणवते. गेले अनेक वर्ष आम्ही फक्त पत्र व्यवहारांच्या माध्यमातून न्याय मागत आहे पण आम्हाला कधी न्याय मिळेल तेच समजत नसल्याने आम्ही नाइलाजास्तव जिल्हा परिषद कार्यालय आवारात आमरण उपोषण करणार आहोत, आमच्या दिव्यांगांच्या जीवितास काही धोका झाल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, अशी मागणी करण्यात आली.

### ... आजतागायत निधी वाटप केला नाही

अनेक वर्षापासून बऱ्याच ग्रामपंचायतीनि शासन निर्णय २०१६ नुसार मिळणारा दिव्यांगाचा ५ टक्के निधि आजतागायत वाटप केलेले नाही. आम्ही संघटनेच्या पदाधिकारी यांनी वारंवार पत्र व्यवहाराच्या माध्यमातून आपल्या कार्यालयाशी संपर्क केला असता, आम्हाला लेखी स्वरूपाची आश्वासने देऊन फक्त सहानभूती दाखवण्याचे काम करण्यात आले.

# प्रवरेच्या कृषीदूतांचे ओझर खुर्दमध्ये आगमन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी गावातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य



डॉ. दिलीप महाले यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रमेश जाधव, डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषीदूत यश सराईकर, सुमित सावंत, अनिकेत गर्जे, तेजस दहिफळे, सुदर्शन नवले हे ओझर खुर्द. येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

याप्रसंगी सरपंच गिरिजा साबळे, उपसरपंच दगडू शेपाळ, ग्रामविकास अधिकारी ज्योती माणिक विधाटे, सुनिल कदम, सुनिल सातपुते तसेच ग्रामस्थ कविता पवार, सुनिता शिंदे व इतर यांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया , गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदी संदर्भात माहिती देणार आहे.

# डॉ. विखे आयटीआयच्या ४० विद्यार्थ्यांची कंपनीत वर्णी

## प्लेसमेंट म्हणजेच प्रगतीत डॉ. विखे पाटील आयटीआयचा विश्वास वाढवणारा टप्पा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** ग्रामीण भागातील कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळाल्यास युवकही उद्योगजगतात आपला ठसा उमटवू शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या एमआयडीसी, अहिल्यानगर येथील इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट संस्थेतील विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे.

संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांनी सलग दोन दिवस झालेल्या कँपस मुलाखतींमध्ये आपल्या उत्कृष्ट कौशल्याने औद्योगिक क्षेत्रात यशस्वी प्रवेश करत संस्थेच्या गुणवत्तेची उजळणी केली आहे. या दोन्ही मुलाखतींमध्ये एकूण ४० प्रशिक्षणार्थ्यांची यशस्वी निवड झाल्यामुळे विद्यार्थी,



पालक व संस्था परिवारात आनंदाचे वातावरण आहे.

दि. ३ जून २०२५ रोजी एपिटोम कॉम्पोनंट्स प्रा. लि., सुपा एमआयडीसी या कंपनीसाठी फिटर, टर्नर, मशिनीस्ट, वायरमन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक व इलेक्ट्रिशियन या ट्रेडसाठी कँपस मुलाखत आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण ९५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते, ज्यामधून ७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

जलसंपदा मंत्री व संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. पी. एम. गायकवाड, सुनील कोल्हापुरे, डॉ. अभिजीत दिवटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे प्राचार्य प्रा. ए. व्ही. सूर्यवंशी, उपप्राचार्य काकडे, गटनिदेशक पठारे, भुसे, व प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी अरुण म्हस्के यांनीही विद्यार्थ्यांचे तसेच संपूर्ण आयटीआय टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

ग्रामीण भागातील युवकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवणे हे आमचे ध्येय आहे, आणि हे यश त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

**– डॉ. सुजय विखे पाटील**

# दुकानासमोर लावलेली दुचाकी चोरीला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील विखे पाटील हॉस्पिटलच्या मेन गेटच्या शेजारी असलेल्या मोबाईल शॉपी दुकानासमोर रस्त्याच्या कडेला इंडियन लोक करुन लावलेली ३० हजार रुपये किमतीची, हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल (क्र एम एच १५ बी वाय २५४८) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विलास गोरक्षनाथ कोल्हे (वय ३४ रा. नवनागपूर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलीस हवालदार चौधरी हे करीत आहे.

# श्री साईबाबा औद्योगिक संस्थेत प्रवेश सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डा संचालित श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी या संस्थेमध्ये ऑगस्ट - २०२५ सत्राकरीता प्रवेश देणे सुरू आहे.

या संस्थेमध्ये वेगवेगळ्या ११ व्यवसायांच्या २१ व्यवसाय तुकडयामध्ये प्रशिक्षण दिले जाते. ऑगष्ट २०२५ सत्राकरीता प्रवेश क्षमता २८० इतकी आहे. सन १९८४ साली संस्थेची स्थापना झालेली आहे. या संस्थेमधील सर्व व्यवसायांना डीजीटी, नवी दिल्ली यांचे कायमस्वरूपी संलग्नता आहे.

सर्व व्यवसायांमध्ये अत्याधुनिक मशिनरीवर अभ्यास क्रमानुसार १०० टक्के प्रशिक्षण दिले जाते. याकामी असणारे सर्व प्रशिक्षक हे अनुभवी व उच्च विद्याविभूषित आहेत. सर्व प्रवेश प्रक्रिया ही संस्थेतील १०० टक्के प्रवेश क्षमतेच्या जागांवार महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेने ऑनलाईन गुणवत्तेनूसार भरल्या जातात याकामी शासनाच्या नियमानुसार अत्यंत माफक प्रशिक्षण शुल्क आकारले जाते.या संस्थेची उत्कृष्ठ निकालाची परंपरा असुन संस्थेमधील सात प्रशिक्षणार्थी आजपर्यंत देशात प्रथम आलेले आहेत व २६ प्रशिक्षणार्थी राज्यात प्रथम आलेले आहेत. संस्थेला केंद्र शासनाच्या सात वेळा वेगवेगळया ट्रेडमध्ये सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार मिळालेले आहेत. प्रशिक्षण पुर्ण होण्याच्या अगोदरच संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांची वेगवेगळ्या नामांकित कंपन्यामध्ये इंटरव्ह्यूचे आयोजन करून शिकाऊ ऊमेदवारी-नोकरीसाठी निवड केली जाते. या सत्राकरीता ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झालेली असुन दि. २६ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी मदत व मार्गदर्शन केंद्र सुरू करणेत आलेले आहे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे.

### ११ व्यवसायासाठी प्रवेश चालू

सन २०२५ मध्ये या संस्थेत इलेक्ट्रीशियन, मेकॅनिक मोटर व्हेईकल, टूल ॲण्ड डायमेकर, मशिनिस्ट ग्राईंडर, टर्नर, फिटर, रेफ्रीजरेशन ॲण्ड एसी मेकॅनिक, इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टिम मेन्टेंनन्स, वेल्डर, मेकॅनिक ट्रॅक्टर, कॉम्म्पयुटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट या ११ व्यवसायासाठी प्रवेश चालू आहेत.

# तहसीलदारांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील जोशी वस्ती वरील आदिवासी भटके विमुक्तांचे अतिक्रमित घरे असणारी गट क्रमांक ५२/५२ वरील जागा लाभार्थ्यांच्या नावे करण्यासाठी गटविकास अधिकारी तथा सदस्य सचिव तालुका शक्ती प्रादत्त समितीची बैठक दि. १२ जून रोजी श्रीगोंदा येथे घेण्यात येणार आहे. तसेच भटके विमुक्तांच्या जातीच्या दाखल्याबाबत परिपूर्ण प्रस्तावाची छाननी करून उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीने सदर दाखले घेण्यासाठी येत्या १५ दिवसात कॅम्प घेण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन श्रीगोंद्याचे तहसीलदार मुदगुल यांनी आंदोलन करताना दिले.

याबाबत तहसीलदारांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील जोशी वस्तीवरील जुना गट नंबर ५२/५२ तसेच नवीन गट नंबर



२/१/५२ या क्षेत्रावर भटके मुक्त समाजाची १९९४ पासून अतिक्रमित कच्ची घर पाल व कुडाची घरे आहेत.

३५० भटके मुक्त कुटुंब राहतात त्यापैकी ३५ कुटुंबांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुले मंजूर झाली आहेत परंतु सदर लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी ते वास्तविक करीत असलेली जागा अतिक्रमण नियमनाकुल करून मिळावी यासाठी १६ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा यांच्याशी चर्चा करून शक्ती प्रदक समितीची बैठक बोलवावी व या बेघर कुटुंबांना जमीन हस्तांतरित करावी.

तसेच श्रीगोंदा तालुक्यातील आदिवासी बांधवांना जातीचे दाखले मिळावेत या मागणीसाठी भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या वतीने श्रीगोंदाचे तहसीलदार मुगदुल यांना आदिवासी समाजातील महिला आदिवासी भटके मुक्त समाजातील महिलांनी घेरावा घालून आंदोलन केले. यावेळी त्यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतो असे लेखी आश्वासन दिले.

# एटीबीटी कापूस लागवडीची परवानगी द्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** महाराष्ट्र शासनाने एकतर मनरेगातून कापूस नींदणी,खुरपणी, डवरणी,तन व्यवस्थापन करता अनुदान द्यावे अन्यथा एटीबीटी तन नाशक सहनशील कापूस बियाणे लागवड करण्याची परवानगी द्यावी, कारण शासन सक्ती करत असलेले इऋ२ कापूस बियाणाचे तन व्यवस्थापन करता एकरी २५ ते ३० हजार रुपये लागतात. त्यातही या इऋ२ कापूस बियाणाला गेल्या अनेक वर्षांपासून पहिल्याच वेचणीला गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव होऊन राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कापूस पीक नष्ट करण्याची वेळ येते आहे.इऋ२ कापूस मुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च प्रचंड वाढून उत्पादन मात्र अजिबात



मिळत नाही त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत.

# शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करा

## कॅबिनेटच्या बैठकीत प्रश्न मांडून प्रश्न सोडविण्याची पालकमंत्री विखे यांची ग्वाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील शिक्षक, शिक्षकेतरांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करण्यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याची मागणी स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी पालकमंत्री राधाकृष्णजी विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य सरकार शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हिताचा विचार करत आहे, पण शिक्षक-शिक्षकेतर वर्गासाठी अत्यंत आवश्यक अशी



कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू नाही. एखादा शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आजारी पडल्यास या योजनेमुळे त्याच्या कुटुंबाल मोठा आधार मिळणार आहे. बऱ्याच वेळा शिक्षकांकडे उपचारासाठी पैसे नसतात, पैसे उभे करण्यात कुटुंबातील व्यक्तीना खूप त्रास सहन करावा लागतो.

शासनाच्या नियमानुसार उपचार पूर्ण झाल्यावर फाईल जमा करू खर्च दिला जातो. पण ही प्रक्रिया खूप वेळ खाऊ असून, गंभीर आजार झाल्यास उसनवारी करुन शिक्षकांना उपचाराचा खर्च भागवावा लागत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

यापसंगी माजी नगरसेवक धनंजय जाधव उपस्थित होते. या मागणीसाठी उमेश भोईटे, अमोल क्षीरसागर, बाबासाहेब गवते, सुनील अंगारखे, सर्व तालुका अध्यक्ष जिल्हा कार्यकारणी सदस्य महिला आघाडी प्रमुख येणाऱ्या काळात योजना लागू होण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

येत्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावे आणि शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम योजनेचा लाभ मिळवून देण्याचा शासन निर्णय निर्गमित करावे.

**– प्रसाद शिंदे, जिल्हाध्यक्ष**

# श्री मोहटादेवी मंदिरात भाविकांची गर्दी

## वटपौर्णिमा निसर्गरम्य वातावरणात उत्साहपूर्ण उत्सव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** श्रीक्षेत्र मोहटा गडावर वटपौर्णिमेच्या निमित्ताने श्री मोहटादेवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. विशेषत: महिला भक्तांची संख्या लक्षणीय होती. मंदिर परिसरात निसर्गरम्य वातावरण आणि पावसामुळे फुललेला डोंगर परिसर यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून पहाटेपासूनच भाविक दर्शनासाठी मोहटागडावर दाखल झाले होते. मंदिराच्या गाभाऱ्यात श्री मोहटादेवीसमोर आंब्याच्या फळांसह विविध प्रकारच्या फळांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. याशिवाय, देवीला प्रसाद स्वरूपात विविध फळांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला, ज्यामुळे गाभाऱ्याचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते.

वटपौर्णिमेला महिलांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. आपल्या पतीच्या उत्तम आयुष्य आणि आरोग्यासाठी वटवृक्षाची पूजा करण्याची परंपरा आहे. श्री मोहटादेवी देवस्थानने मंदिर परिसरात वटवृक्ष पूजेसाठी विशेष व्यवस्था केली होती. यामुळे महिला भक्तांनी उत्साहाने वटवृक्षाची पूजा करून धार्मिक विधी पार पाडले. मंदिर परिसरात आनंददायी आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेले श्री मोहटादेवी मंदिर हे आकर्षक स्थापत्य आणि निसर्गरम्य परिसरासाठी प्रसिद्ध आहे. सध्या पावसामुळे मंदिर परिसर आणि मोहटागडाचा डोंगर हिरवागार आणि नयनरम्य झाला आहे. माहूरच्या श्री रेणुकामातेचे अंशात्मक स्थान म्हणून मोहटादेवीचे विशेष महत्त्व आहे. देवी नवसाला पावते, अशी भक्तांमध्ये श्रद्धा असल्याने वटपौर्णिमेच्या या विशेष पर्वणीला महिलांनी विविध धार्मिक विधींसह देवीची आराधना केली.

### भाविकांना मिळाले सुलभ दर्शन

मोहटादेवी देवस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश महेश लोणे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे आणि संपर्क अधिकारी भीमराव खाडे यांनी भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा पुरवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या नियोजनामुळे भाविकांना कोणत्याही अडचणी शिवाय दर्शनाचा आणि धार्मिक विधींचा लाभ घेता आला.



# ‘लिफ्ट योजनेसाठी चोपडेंचे योगदान’

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आश्वी :** आश्वी बुद्रुक येथुन निमगावजाळी गावासाठी पाण्याची लिफ्ट योजना सुरू आहे. अनेकदा स्थानिक ग्रामस्थांचे लिफ्ट योजना सुरू होण्यासाठी विरोध केला. पण राधाकृष्ण चोपडे यांनी लाभार्थी शेतकरी व स्थानिक ग्रामस्थांशी मध्यस्थी करत लिफ्ट योजना पुन्हा सुरू करण्यासाठी मोठा प्रयत्न केला तसेच ती नियमत सुरू राहण्यासाठी ही त्यांचा पुढाकार होता, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक विजयराव म्हसे यांनी केले.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अतंर्गत येणाऱ्या आश्वी बुद्रुक निमगावजाळी लिफ्ट योजने कर्मचारी राधाकृष्ण चोपडे यांच्या ४४ वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्ती कार्यक्रमात संचालक विजयराव म्हसे बोलत होते. याप्रसंगी आर. डी. कदम, रंगनाथ उंबरकर, तुळशीराम म्हस्के, डॉ. दिनकर गायकवाड, पोपट उबंरकर, भागवत उंबरकर, सुरेश भुसाळ, रामभाऊ भुसाळ, बाळासाहेब उंबरकर, बाळासाहेब दिघे, भारत तांबे, प्रकाश खेमनर, संपत उंबरकर, गंगाधर गायकवाड, दिपक सोनवणे, किरण गायकवाड, इंजिनियर अभिजीत म्हसे उपस्थित होते.

# विळदमध्ये पडला सशस्त्र दरोडा

## सात जण जखमी : दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विळद शिवारातील नारूंडी पाझर तलावाजवळ राहात असलेल्या मेंढपाळांवर ६ ते ७ दरोडेखोरांनी दरोडा टाकल्याची घटना मध्यरात्री दीडच्या सुमारास घडली. दरोडेखोरांच्या हल्ल्यात चार जण जखमी झाले असून महिलांचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण १ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

लक्ष्मण विठ्ठल सूळ, प्रकाश लक्ष्मण सूळ, शीतल पोपट होडगर, सुमन लक्ष्मण सूळ अशी जखमींची नावे आहेत.



जखमींवर उपचार करण्यात येत आहेत. दरोडेखोरांनी चाकुचा धाक दाखवत लाकडी दांडक्याने मारहाण केली. ६ हजार रूपये किंमतीचे २ ग्रॅम वजनाचे कानातील कर्णफुले, २४ हजार रूपये किंमतीचे ८ ग्रॅम वजनाचे मनी मंगळसूत्र, १५ हजार रूपये किंमतीचे ५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा बदाम, ६ हजार रूपये किंमतीचे कानातील कर्णफुले, ३० हजार रूपये किंमतीचे मनी मंगळसूत्र, ७० हजार रूपयांची रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला. या घटनेची पोपट बन्सी होडगर (वय ३५, रा. पिंप्री घुमट, विळद) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात ६ ते ७ जणांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

### अशी घडली आहे घटना

फिर्यादी आणि इतर मेंढ्या सांभाळण्यासाठी तेथे असताना ६ ते ७ दरोडेखोर काळ्या कपड्यामध्ये येताना दिसले. फिर्यादी पोपट होडगर यांना एका दरोडेखोराने काठी उगारली. होडगर यांनी त्या दरोडेखोरावर कांबळ फेकली. एका दरोडेखोराने फिर्यादी यांच्या पत्नीस काठी मारली. त्यामुळे घाबरून त्या आरडाओरड करत असताना त्यांच्या गळ्याला चाकू लावून दागिने काढून घेतले.

# शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा

## डॉ. शेळके; संगमनेर येथील शेतकऱ्यांना कृषीसाहित्याचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय असून ग्रामीण जनता शेतीवर अवलंबून आहे. बदलत्या हवामानाला सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये अवलंबन करून शेतीची उत्पादकता व उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करणे हा शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा उपक्रम असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे कार्यरत असलेल्या कन्सोरशिया रिसर्च प्रोजेक्ट, आयओटी सक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली हा प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून कृषि साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन वडझरी खु., ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल कदम, वडझरी खु., गावचे उपसरपंच श्री. पांडुरंग सुपेकर, स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. प्रमोद पोपळे उपस्थित होते.

डॉ. सुनिल कदम यांनी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन कृषि साहित्य वाटपाचा महत्त्वाचा उद्देश शेतकऱ्यांना समजावून सांगितला. याप्रसंगी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून वडझरी खु. गावातील ३२ शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृषि अवजारे, जैविक खते, जैविक औषधे व कृषिदर्शनी-२०२५ या साहित्याचा समावेश होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पांडुरंग सुपेकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र सुपेकर तर आभार अशोक भडांगे यांनी मानले.

# नेवासा तालुक्यात स्वस्त धान्यापासून अनेकजण वंचित

## लाभार्थ्यांसाठी २० हजार इष्टांक वाढवून देण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** तालुक्यातील रेशनधारक कुटुंबांना तालुकास्तरावर इष्टांक शिल्लक नसल्याने २० हजार इष्टांक वाढवून देण्याची मागणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे केली असल्याची माहिती नेवासा तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष शरद आरगडे यांनी दिली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, नेवासा तालुक्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये धान्य मिळण्यापासून लाभार्थी वंचित आहेत. मागील चार ते पाच वर्षापासून अनेक ग्राम पंचायतीने धान्य मिळण्यासाठी लाभार्थ्यांचे ठराव तहसिल कार्यालयाकडे पाठवलेले आहेत; परंतु अनेक लाभार्थी आजही त्यापासून वंचित आहेत. गरजू व्यक्तींना आजही स्वस्त धान्य दुकानावर धान्य मिळत नाही. धान्य सुरू करण्यासाठी तहसिल कार्यालयाकडे अनेक चकरा माराव्या लागतात परंतू त्या ठिकाणी इष्टांक शिल्लक नसल्याचे उत्तर दिले जाते.

तसेच प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीने कार्यालयाकडे तहसिल गावातील लग्न झालेल्या मुली तसेच मयत व्यक्ती यांचे नावे मिळत असलेले रेशन रद्द करून ते रेशन गावातील गोरगरीब गरजू लाभार्थ्यांना मिळावे यासाठी देखील ठराव दिलेले आहेत.



ज्या ग्रामपंचायतीने आपल्या गावातील ठराव दिलेले आहेत त्यांचा इष्टांक त्याच ग्राम पंचायतीला देऊन लाभार्थ्यांना धान्य सुरू करण आवश्यक होते; परंतु नेवासा पुरवठा शाखेने सदरच्या इष्टांक इतर ग्राम पंचायतच्या लाभार्थ्यांना दिल्याचे निदर्शनात येत असल्याचे आरगडे यांनी म्हटले आहे.


नवीन काढलेले रेशनकार्ड तसेच जुने बंद पडलेले रेशनकार्ड असे मिळून तालुक्यामध्ये खूप मोठ्या संख्येने रेशनधारक धान्यापासून वंचित आहेत. त्यांना तातडीने धान्य मिळण्यासाठी कमीत कमी २० हजार इष्टांक नेवासा तालुक्याला देणे आवश्यक आहे, तसे न झाल्यास नेवासा तालुका सरपंच संघटनेच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, नेवासा तहसिलदार यांना निवेदनाच्या प्रती ईमेल द्वारे देण्यात आल्या आहेत.

# फुंदे यांची युनियन बँकेत मॅनेजरपदी नियुक्ती

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचा विद्यार्थी असलेल्या विष्णू पांडुरंग फुंदे यांची युनियन बँक ऑफ इंडिया, तेलंगणा येथे बँक मॅनेजर पदावर नुकतीच नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, माजी नगरध्यक्ष अभय आव्हाड तसेच उपनगराध्यक्ष नंदकुमार शेळके यांच्या हस्ते करण्यात आला.



विष्णू फुंदे यांनी ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. फुंदे यांनी पदवीधर शिक्षण बाबुजी आव्हाड महाविद्यालयातून पूर्ण केले असून, त्यानंतर बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांची तयारी करून यश मिळवले. महंत आदिनाथ महाराज म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मेहनतीने आपले ध्येय गाठावे. विष्णू यांचे यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. अभय आव्हाड म्हणाले,अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांनी गावाचे, महाविद्यालयाचे आणि कुटुंबाचे नाव उज्वल केले आहे.

# निवडुंगे ग्रामस्थांचा तहसीलसमोर सत्याग्रह

## हद्द मोजणीच्या मागणीसाठी तीव्र आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** निवडुंगे ग्रामस्थांनी त्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काल पाथर्डी तहसील कार्यालयासमोर शांततामय पण ठाम असा ‘‘बैठा सत्याग्रह‘‘ केला. नगर-पाथर्डी रस्त्यावर गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसवणे आणि सिटी सर्वे नंबर ६९० व ६९१ यांची मोजणी करून हद्द निश्चित करणे या दोन मुख्य मागण्यांसाठी ग्रामस्थ एकवटले.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, यापूर्वीही प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदन देण्यात आले. मात्र त्यावर केवळ लेखी आश्वासने मिळत असून कोणतीही ठोस कारवाई अद्याप झालेली नाही. गतिरोधक नसल्यामुळे या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढले




असून विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागतो.

दुसरीकडे, मोजणी व हद्द निश्चिती न झाल्याने मालकी हक्क आणि जमिनीचे वाद निर्माण होत असून गावात वादाचे वातावरण आहे. सत्याग्रहात सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड, प्रा. सुनील पाखरे, संजय मरकड (सरपंच मढी), सुरेश नागरे, रामेश्वर काळापाहाड, विठ्ठलराव सोनटक्के यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी उपस्थित राहून घोषणाबाजी करत प्रशासनाच्या भूमिकेचा तीव्र निषेध केला.

दरम्यान, तहसीलदार उद्धव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीस भूमी अभिलेख विभाग, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग पावडीचे अभियंते, पंचायत समिती पाथर्डीचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत दोन्ही मागण्यांवर चर्चा होऊन, सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

# एसटी वाहकाला प्रवाशाकडून मारहाण

## तिकीटाच्या पैशावरून वाद; एक जणाविरूध्द गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तिकीटाच्या पैशावरून एसटी वाहक व प्रवाशामध्ये वाद झाला. या वादातून प्रवाशाने वाहकाला मारहाण करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याची घटना सोमवारी पहाटे ५:३० वाजेच्या सुमारास नेवासकर पेट्रोल पंप, मार्केटयार्ड येथे घडली.

या प्रकरणी वाहक राजेंद्र कराळे (रा. आगडगाव, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



साहील साळवे (वय २१ रा. भिंगारदिवे मळा, सावेडी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. फिर्यादी कराळे हे २००३ पासून एसटी महामंडळात वाहक पदावर कार्यरत आहेत. सोमवारी पहाटे ५ वाजता ते आपल्या सहकारी चालक नीलेश शेळके (रा. गुणवडी, ता. नगर) यांच्यासह एमएच १४ बीएल ००४० क्रमांकाच्या बसवर नगर ते पुणे मार्गावर ड्युटीवर होते. बस तारकपूर स्थानकाहून निघाल्यानंतर ५.३० वाजता नेवासकर पेट्रोलपंपाजवळ प्रवाशी साळवे याला तिकीट मागितले असता, तो ऑनलाईन तिकीट काढणार असल्याचे सांगू लागला.

वाहक कराळे यांनी ऑनलाईन सर्व्हर बंद आहे. रोख रक्कम देऊन तिकीट काढावे लागेल असे सांगितल्यावर साळवे याने वाद घालून शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर साळवे याने कराळे यांची गचंडी पकडून त्यांना बसमधून खाली रस्त्यावर ओढले व मारहाण केली. यानंतर दोघांनी मिळून सदर प्रवाशाला पुणे बसस्थानक नियंत्रण कक्ष येथे नेले. तिथे घटनेची माहिती कोतवाली पोलीस ठाण्याला दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

# खा. लंकेंची भेट आणि आरोग्यसेवकांना नियुक्त्या

## अनेक दिवसांचा प्रश्न निकाली लागल्याने आनंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील ५० टक्के आरोग्यसेवक भरती प्रक्रिया लांबणीवर पडल्याने उमेदवारांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभुमीवर खा. लंके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची भेट घेत आरोग्य सेवकांच्या नियुक्त्यांबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली. त्यावर भंडारी यांनी उमेदवारांचे समुपदेशन करत उमेदवारांना तात्पुरत्या नियुक्त्यांचे आदेश दिले.

आरोग्य सेवकांच्या या प्रश्नासंदर्भात दि. २९ मे रोजी खा. नीलेश लंके यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना लेखी पत्र देऊन आरोग्य सेवकांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. हा प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही मंत्री गोरे व अधिकारी भंडारी यांनी दिली होती.

हा प्रश्न अजूनही प्रलंबित असल्याचे आरोग्य सेवकांकडून सांगण्यात आल्यानंतर आरोग्य सेवकांनी खा. लंके यांची भेट घेत त्यांच्याकडे पुन्हा गाऱ्हाणे मांडले. त्यावेळी नगरमध्येच असलेल्या खा. लंके यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात जात या उमेदवारांचा



प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची मागणी केली.

यावेळी युवक काँग्रेसचे अध्यक्ष रामेश्वर निमसे, नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रविंद्र राजदेव, सरपंच आदीनाथ गायकवाड, भानुदास आग्रे, गणेश तोडमल, प्रवीण वारूळे, यांच्यासह आरोग्य सेवक उपस्थित होते. खा. लंके यांनी या प्रश्नात लक्ष घालून तो तडीस नेल्याबद्दल खा. लंके यांच्याप्रती आरोग्य सेवकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

### निवडीचे ऑनलाईन आदेश

या भरती प्रक्रियेतील १८७ उमेदवारांना अद्याप कामावर रूजू करून घेण्याचे आदेश देण्यात आले नव्हते. त्याबाबत खा. लंके यांनी आनंद भंडारी यांच्याकडे विचारणा केली. त्यानंतर या उमेदवारांना तात्काळ निवडीचे ऑनलाईन आदेश देण्यात आले. ऑनलाईन आदेश मिळाल्याने आरोग्य सेवकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# संत ज्ञानेश्वर विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** जुने दिवस आठवले... आणि मन पुन्हा शालेय वयात गेले. हेच शब्द होते. पाथर्डी शहरातील संत ज्ञानेश्वर विद्यालयातील इयत्ता १०वी (२००९-२०१०) च्या बॅचच्या स्नेहमेळाव्यास आलेल्या अनेक माजी विद्यार्थ्यांचे. तब्बल १५ वर्षांनंतर पुन्हा एकत्र येण्याचा आनंद, आठवणींचा कल्लोळ आणि शिक्षकांबद्दलची कृतज्ञता यांनी शाळेचा परिसर भारून गेला.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अनिल शिरसाट, उपाध्यक्ष सुनिल शिरसाट, सचिव महेंद्र शिरसाट, विद्यालयाचे प्राचार्य सुरेश मिसाळ यांच्यासह विद्यालयातील माजी व विद्यमान शिक्षक उपस्थित होते. यामध्ये भास्कर बुधवंत, अशोक खेडकर, बाळासाहेब घोडके, मिना तडके, आत्माराम दहिफळे, शिवाजी शेकडे, विक्रम शिरसाट, सतिष बडदे, संतोष काळोखे, सचिन कसबे, दिपक ढाकणे, इश्वर गायकवाड, दिपक गावित, जयश्री इंदे, पौर्णिमा नन्हे, जयश्री उनवणे, पायल शर्मा, पुजा शिरसाट, महादेव विघ्ने, साईनाथ मरकड, पांडुरंग धोत्रे इत्यादींचा उल्लेखनीय सहभाग होता. स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशोगाथा शेअर करत शाळेच्या भूमिकेबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

# संपादकीय

## काश्मिरी तरुणांसाठी नवी दिशा

आज भारतीय सैन्य काश्मिरमधील तरुणांना त्यांचे भविष्य सुधारण्याचा मार्ग दाखवत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाने राज्यातील तरुणांमध्येही उत्साह भरला आहे. आता त्यांना पाकिस्तानच्या गोळीबाराला प्रत्युत्तर देण्यासाठी सैनिक बनून धडा शिकवायचा आहे. लष्करही दुर्गम भागातील उत्साही तरुणांना भारतीय सैन्यात अग्निवीर बनून देशाची सेवा करण्यासाठी तयार करत आहे. काश्मिरच्या दोडा जिल्ह्यात भारतीय सैन्याने सुमारे पन्नास तरुणांना अग्निवीर बनण्यासाठी प्रशिक्षण दिले आहे. अग्निवीर बनण्यासाठी आणि आपले ध्येय साध्य करण्यासाठी सर्व आव्हानांवर मात कशी करायची, हे त्यांना शिकवण्यात आले आहे. दोडा जिल्ह्यातील तरुणांसोबतच जम्मू विभागातील किश्तवार, राजौरी पूंछ जिल्ह्यांसह काश्मीर विभागातील कुपवाडा आणि बारामुल्ला जिल्ह्यांमधील तरुणांना प्रशिक्षण देण्याची तयारी सध्या सुरू आहे. कुपवाडा येथे तरुणांसाठी एक संगणक केंद्रदेखील उघडण्यात आले आहे. अग्निवीरची लेखी परीक्षा जूनच्या शेवटच्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीरमध्ये होणार आहे. अशा परिस्थितीत, प्रशिक्षण शिबिरांदरम्यान तरुणांना लेखी परीक्षेची तयारी कशी करावी हे शिकवले जात आहे. यासोबतच दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या शारीरिक चाचणीसाठी त्यांना क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षण दिले जाणार आहे. दुर्गम भागातील बलवान तरुणांना सैन्यात सामील होता यावे, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. जम्मूचे डिफेन्स लेफ्टनंट कर्नल सुनील बटवाल म्हणतात की, सैन्य जम्मू आणि काश्मीरमधील तरुणांचे भविष्य उज्ज्वल करण्याचा प्रयत्न करत आहे. दुर्गम भागात शिक्षणाला चालना देण्यासाठी लष्कराने खूप काम केले आहे. आता सुशिक्षित तरुणांना चांगले भविष्य कसे घडवायचे हे शिकवले जात आहे. सैन्याने वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरांमध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर शेकडो तरुण सध्या सैन्यात सामील होऊन देशाची सेवा करत आहेत. दुर्गम भागातील तरुणांना अग्निवीर बनवण्यासोबतच, लष्कर त्यांना ग्राम संरक्षण गटात (व्हीडीजी) समाविष्ट करून त्यांच्या गावांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी तयार करत आहे. दुर्गम आणि सीमावर्ती भागातील तरुणांनी गणवेश घालून किंवा न घालता देशाच्या शत्रूंशी लढण्यासाठी सज्ज असावे, हे लष्कराचे उद्दिष्ट आहे. सीमावर्ती भागातील परिस्थिती बिघडवण्यासाठी पाकिस्तान जास्तीत जास्त प्रयत्न करतो. अशा परिस्थितीत सध्या सैन्य आणि जम्मू-काश्मीर पोलिस दुर्गम, सीमावर्ती जिल्ह्यांमधील तरुणांना शत्रूशी लढण्यासाठी असॉल्ट रायफल्सचे प्रशिक्षण देत आहेत. निवृत्त कर्नल संजीव गुप्ता म्हणतात की भारतीय सैन्य दुर्गम आणि सीमावर्ती भागातील तरुणांच्या ताकदीचा योग्य दिशेने वापर करत आहे. तरुणांची स्वप्ने पूर्ण होत आहेत. पाकिस्तान तरुणांचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी करण्याचा प्रयत्न करतो. भारतीय सैन्याने तरुणांना एक चांगला मार्ग दाखवला आहे. सैन्यात आपला कार्यकाळ पूर्ण करून परतणारे तरुण राष्ट्रवादी शक्तींना बळकटी देतील. त्याच वेळी अग्निवीर बनू न शकणारे ग्राम संरक्षण गटाचे बलस्थान बनू शकतात.

आज पाकिस्तान उघडा पडत आहे. या नैराश्यात तो थेट सीमावर्ती भागांना लक्ष्य करतो. आता तरुण 'आर्मी गुडविल स्कूल'मध्ये शिक्षण घेऊन आणि आर्मीच्या 'सुपर फिफ्टी'सारख्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन डॉक्टर आणि इंजिनीअर बनत आहेत. तरुणांना अग्निवीर आणि अधिकारी बनण्यास मदत केली जात आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर स्थानिक तरुणांचा ओढा लष्कर भरतीकडे आहे. मोकळ्या हातांना रोजगार मिळाला, तर ते दहशतवादी कारवायांकडे वळणार नाहीत, असा त्यामागचा हेतू आहे. काश्मीरमधील पर्यटन उद्योगावर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा स्थानिकांच्या पोटावर पाय देण्याचा प्रयत्न असल्याने आता दहशतवाद्यांना शोधण्यासाठी तसेच त्यांचा प्रतिकार करण्यासाठी स्थानिकांची मदत होत आहे, ही चांगली बाब आहे. भारत आणि पाकिस्तानमधील तणावाचा थेट परिणाम सीमावर्ती भागातील लोकांवर होतो, कारण युद्ध असो वा नसो; गावकऱ्यांना सामाजिक आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागते. हे नुकसान टाळण्यासाठी आणि अतिरेक्यांना उत्तर देण्यासाठी नवे 'मिशन काश्मिर' कामी येत आहे, हे महत्वाचे. २००२ मध्ये तत्कालीन अटलबिहारी वाजपेयी सरकारने ज्या पद्धतीने पाकिस्तानवर बंदी घातली होती, त्याला धडा शिकवला, त्याचप्रमाणे पुन्हा धडा शिकवण्याची गरज आहे. पाकिस्तानला आपल्या लोकांची काळजी नाही; पण भारताला आपल्या लोकांची जास्त काळजी आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात दहशतवाद्यांनी निष्पाप लोकांचे रक्त सांडल्यामुळे देशातील लोकांमध्ये प्रचंड संताप आहे. पाकिस्तानमध्ये कार्यरत असलेले दहशतवादी तळ नष्ट केले नाहीत, तर दहशतवादी पुन्हा अशा घटना घडवू शकतात. भारताने आता दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त केले असले, तरी ते पुरेसे नाही. पाकिस्तानमध्ये असलेल्या अन्य दहशतवाद्यांनाही धडा शिकवला पाहिजे. त्यासाठी पाकव्याप्त काश्मीरचा भाग भारताला जोडण्यासाठी आता निर्णायक लढाई व्हायला हवी, असे स्थानिक नागरिकांनाही वाटते. दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरचे पर्यटन ठप्प झाले असले, तरी आता त्यातून सावरायला सुरुवात झाली आहे. श्रीनगर विमानतळ पुन्हा सुरू झाले आहे. त्यातून पहिल्याच दिवशी सहाशेहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. काश्मीरमध्ये आता सहा महिने पर्यटन हंगाम बंद राहणार असला, तरी त्यानंतर काश्मीर पुन्हा पर्यटकांनी बहरून जावे, असा स्थानिक प्रशासनाचा प्रयत्न आहे. अभिनेता अतुल कुलकर्णीसह अनेकांनी दहशतवादी हल्ल्यानंतर मुद्दाम काश्मीरमध्ये हजेरी लावली. केंद्र सरकार आणि राज्य सरकारही काश्मीरची अर्थव्यवस्था रुळावर यावी, असा प्रयत्न करत आहे. काही सवलती देता येतील का, याचा विचार सरकार करत आहे. देशातील नागरिकांनीही दहशतवाद्यांचा आणि पाकिस्तानचा हेतू साध्य होऊ नये म्हणून काश्मीरला भेट देण्याची आवश्यकता आहे.

# तमिळ-कन्नडचा वाद

**राज्यरंग**
**- व्ही. त्यागराजन**



प्रसिध्द चित्रपट अभिनेते कमल हसन यांच्या एका विधानावरून अलिकडे चांगलाच वाद माजला. तमिळी भाषेतून कन्नडचा जन्म झाल्याचे त्यांचे विधान वादाला खतपाणी घालणारे ठरले आहे. वास्तविक पाहता आजघडीला कोणती भाषा जुनी, कोणती श्रेष्ठ असा वाद घालण्याचे काहीही कारण नाही. भाषा भगिनी परस्पर सहकार्याने वाढतात, हे नेहमीच पहायला मिळाले आहे.

दक्षिण भारतातील सुप्रसिध्द अभिनेते कमल हसन यांनी कन्नड भाषा तमिळ भाषेतून निर्माण झाल्याचे विधान केल्यावरून अलिकडेच मोठा वाद निर्माण झाला. यावरून कर्नाटकात प्रचंड गदारोळ सुरू आहे. सामान्य कन्नड भाषिकांपासून ते कर्नाटकच्या राजकारण्यांपर्यंत सर्वांनीच हसन यांच्यावर टीका केली आहे. हसन यांच्या नवीन 'ठग लाईफ' या चित्रपटावर बहिष्कार टाकण्यात आला आहे. त्यानंतर त्यांनी या वादावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, की मी भाषेबद्दल बोलण्यास पात्र नाही. कोणताही राजकारणी भाषेबद्दल बोलण्यास पात्र नाही, मीही यात सामील आहे. तथापि, यानंतरही हा वाद थांबताना दिसत नाही. त्यांच्या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान पुढे आलेल्या विधानाने वाद सुरू झाला. चेन्नईमध्ये कमल हसन यांच्या 'ठग लाईफ' या चित्रपटाच्या प्रमोशनप्रसंगी त्यांच्यासोबत कन्नड चित्रपटस्टार शिवराजकुमारदेखील उपस्थित होते. त्या वेळी हसन शिवराजकुमार यांच्याकडे बोट दाखवत म्हटले, की तो आमच्या कुटुंबाचाही एक भाग आहे. त्यांची भाषा (कन्नड) ही आमच्या भाषेतून (तमिळ) आली आहे. कन्नड भाषिक लोकांनी हसन यांच्या या विधानाला त्यांचा अपमान असल्याचे म्हणत गोंधळ घातला. कर्नाटकमधील बेळगाव, म्हैसूर, हुबळी, बंगळुरू आदी भागांमध्ये कन्नड समर्थक संघटनांनी हसन यांच्या विरोधात निदर्शने केली आणि बिनशर्त माफी न मागितल्यास त्यांचे चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होऊ न देण्याची धमकी दिली. हसन यांनी माफी मागण्यास नकार दिल्यानंतर हा वाद जणू दोन राज्यांमधील वादविषय बनला.

द्रविड भाषांच्या उत्पत्तीचा शोध घेण्यासाठी अनेक लोकांनी संशोधन केले. वसाहतवादी विद्वान आणि संशोधक रॉबर्ट काल्डवेल यांनी द्रविड भाषांवर केलेल्या संशोधनाचा संदर्भ जगभरातील लोक घेतात. त्यात भाषातज्ज्ञांचाही समावेश आहे. पूर्वी अन्नामलाई विद्यापीठात द्रविड भाषा केंद्र होते. द्रविड भाषांअंतर्गत १३० भाषा ओळखल्या गेल्या आहेत. पूर्वी पाच द्रविड भाषा होत्या. त्यात तमिळ, तुळु, कन्नड, तेलुगू आणि मल्याळम यांचा समावेश आहे. त्यांना 'पंच' द्रविड भाषा म्हणतात. आता आदिवासी भाषांवरही बरेच संशोधन केले जात आहे. द्रविड भाषा गटात १३० हून अधिक भाषा मोडत आहेत. सुमारे चार वर्षांपूर्वी या पाच द्रविड भाषा एकच भाषा होत्या. कन्नड, तमिळ आणि तेलुगु यांचे नाते आई आणि मुलीचे नाही, तर बहिणींचे आहे. कन्नड भाषेचा उगम तमिळ भाषेतून झाला नाही; परंतु लोक आपल्या भाषेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्याबाबत आग्रह धरत राहतात. भाषेभोवती ते राजकारण खेळतात.

कर्नाटकच्या राजकारण्यांनी हसन यांच्या विधानावर टीका केली आहे. काँग्रेस नेते आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले की, कन्नडचा इतिहास खूप जुना आहे; पण 'बिचाऱ्या' हसन यांना त्याची काहीच माहिती नाही. माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा यांनी हसन यांच्या विधानाला अहंकाराची मर्यादा ओलांडणारे आणि कन्नड भाषेचा तसेच अभिनेते शिवराजकुमार यांचा अपमान करणारे म्हटले. हसन हे तामिळनाडूमधील मक्कल निधी मय्यम (एमएनएम) या राजकीय पक्षाचे संस्थापक आहेत आणि त्यांचा पक्ष राजकारणात सक्रिय आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या विधानाला कर्नाटक आणि तामिळनाडूमधील पाण्यासह अनेक मुद्द्यांवरच्या जुन्या वादांशीदेखील जोडले जात आहे. कर्नाटकमधून तीव्र वाद उभा राहिल्यानंतर माफी न मागता कमल हसन म्हणाले, 'मी जे बोललो, ते प्रेमाने बोललो होतो आणि अनेक इतिहासकारांनी मला भाषेचा इतिहास शिकवला आहे. माझा कोणत्याही भाषेचा अपमान करण्याचा कोणताही हेतू नव्हता. तामिळनाडू हे नेहमीच उदार आणि पुरोगामी राज्य राहिले आहे. असे दुसरे कोणतेही राज्य नाही, असे मला म्हणायचे नाही; पण तामिळनाडू हे एक अतिशय दुर्मिळ राज्य आहे, जिथे मेनन (एम. जी. रामचंद्रन) मुख्यमंत्री राहिले. नंतर रेड्डी (ओमंडुर रामास्वामी रेड्डियर) मुख्यमंत्री राहिले, तमिळ (एम. करुणानिधी) मुख्यमंत्री राहिले आणि मंड्या येथील कन्नड अय्यंगारही तमिळनाडूचे मुख्यमंत्री राहिले. राजकारणी भाषेवर बोलण्यास पात्र नाहीत. त्यांच्याकडे याबद्दल बोलण्याची क्षमता नाही. इतिहासकार, पुरातत्वशास्त्रज्ञ आणि भाषाशास्त्रज्ञांनी या बाबींवर सखोल चर्चा करावी, असे माझे म्हणणे आहे.

कन्नड आणि तमिळींमधील श्रेष्ठत्वाचा वाद गाजत असला, तरी इतिहासात या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. दोन्ही द्रविड भाषांचा इतिहास खूप जुना आहे. भाषातज्ज्ञांच्या मते दोन्ही द्रविड कुटुंबातील महत्त्वाच्या भाषा आहेत. त्यांचा उगम द्रविडच्या वेगवेगळ्या शाखा म्हणून झाला. कन्नड ही आज सुमारे ३.८ कोटी लोकांची पहिली आणि सुमारे एक कोटी लोकांची दुसरी भाषा आहे. दुसरीकडे, भारत, श्रीलंका, सिंगापूर, मलेशिया, मॉरिशस, फिजी आणि दक्षिण आफ्रिका यासह सुमारे सात देशांमध्ये तमिळ एक महत्त्वाची भाषा म्हणून बोलली जात आहे. ही संख्या सुमारे सात कोटी आहे. कन्नड भाषेचा जन्म सुमारे २५०० वर्षे जुना असल्याचे मानले जाते. सर्वात जुना कन्नड शिलालेख हलमिदी या छोट्या समुदायात सापडला आहे. तो सुमारे ४५० इसपूर्व असल्याचे आढळून आले आहे. हा कदंबांचा शिलालेख आहे. तथापि, काही इतिहासकारांचा दावा आहे की, कन्नड भाषा इसवी सनपूर्व तिसऱ्या शतकातही बोलली जात होती.

अलेक्झांड्रियाचे विद्वान टॉलेमी यांनी लिहिलेला भूगोल हा कन्नड भाषेच्या प्राचीनतेचा एक महत्त्वाचा दस्तावेज मानला जातो. त्यात कर्नाटकमधील कलगेरिस (सध्याचे कलकेरी), बदामिओस (बदामी), मोडोगुल्ला (मुदुघल) सारख्या ठिकाणांचा उल्लेख आहे. हा दस्तावेज इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील आहे. या इतिहासकारांचा विश्वास आहे, की कन्नड भाषेचा उगम इसवी सनपूर्व सुमारे ९५० वर्षांमधील आहे. कर्नाटकमध्ये सापडलेल्या सम्राट अशोकच्या शिलालेखांमध्येही कन्नड शब्द सापडले आहेत. तथापि, भाषातज्ज्ञांचा अंदाज आहे की, कन्नड लिपी अशोकाने लिहिली होती. कन्नड भाषेचा विकास ब्राह्मी लिपीच्या दक्षिणेकडील रूपांपासून झाला, असे मानले जाते. कन्नड भाषेला तिचे सध्याचे नाव नवव्या शतकात मिळाले. राजा नृपतुंगावर कविराज मार्ग हा काव्यग्रंथ कन्नड भाषेतील सर्वात जुना साहित्यिक ग्रंथ मानला जातो. यापूर्वी सातव्या शतकात बदामी येथील कप्पे अर्भट्टचा रेकॉर्ड कन्नडचा पहिला काव्यग्रंथ मानला जातो. त्याआधीही पाचव्या शतकात मंगलेशचा बदामी रेकॉर्डदेखील सापडला आहे. कन्नड भाषा जुनी आणि पूर्व-जुनी अशा दोन भागात विभागली गेली आहे. जुन्या कन्नडचा रेकॉर्ड ८०० ते १००० इसवी सनाचा आहे, तर पूर्व-जुनी कन्नडचा रेकॉर्ड ४५० ते ८०० इसवी सनाचा आहे. कन्नड भाषेच्या आधुनिक लिपीचे सर्वात जुने रूप कदंब लिपी मानले जाते. होयसाला कन्नड लिपी ही या भाषेची सर्वात सजावटीची लिपी मानली जाते. ती होयसाला राजांनी कल्याण चालुक्य कन्नड लिपीतून विकसित केली होती.

आज कन्नड भाषेचे २० हून अधिक वेगवेगळे प्रकार दिसतात. त्यात सोलिगा कन्नड, कोडावा, ह्वेका, कुंडा, आरे भाशे, बडागा कन्नड, हुबळी कन्नड आणि गुलबर्गा कन्नड यांचा समावेश आहे. तमिळ भाषा ही इसवी सनपूर्व २५०० ते १५०० या काळातील भाषा मानली जाते. भाषाशास्त्रज्ञांचा विश्वास आहे की तमिळ भाषा द्रविड भाषेचादेखील एक भाग आहे. ती सुमारे ३,५०० वर्षांपूर्वी संस्कृत घेऊन भारतात आलेल्या 'इंडो-आर्यां'च्या आगमनापूर्वी येथे बोलली जात होती. या दाव्यानुसार, तमिळ भाषा ४,००० ते ४,५०० वर्षे जुनी असू शकते. तमिळ भाषेचे साहित्य, कविता आणि धार्मिक हस्तलिखिते इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत आढळतात. तथापि, द्रविड भाषा गटापासून वेगळी भाषा म्हणून तमिळ भाषेची सुरुवात इ.स.पूर्व एक हजारपासून झाली, असे मानले जाते. ही क्लासिक तमिळ मानली जाते. मध्ययुगीन काळात चोल साम्राज्यातील राजराज चोल-१ आणि राजेंद्र चोल-१ यांनी तमिळ शिलालेख, मंदिर वास्तुकला आणि साहित्याला प्रोत्साहन दिले. दोन्ही भाषांचा इतिहास पाहिल्यास त्या एकाच भाषा गटातून जन्माला आल्या आहेत, हे स्पष्ट होते. परंतु कमल हसन यांचा कन्नड भाषा तामिळ भाषेतून जन्माला आली आहे, हा दावा बरोबर वाटत नाही. द्रविड भाषा गटाचा भाग असल्याने, दोघांमध्ये काही समानता असू शकतात; परंतु प्रत्यक्षात दोन्ही भाषा खूप वेगळ्या भाषा म्हणून विकसित झाल्या आहेत.

# प्रवरेत उद्या शोध निबंध व स्टार्टअप परिषद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थे अंतर्गत प्रवरा रुरल इंजिनिअरिंग कॉलेज, लोणी येथे आंतरराष्ट्रीय पातळीवरील शोधनिबंध परिषद आणि स्टार्टअप इनोव्हेशन कोन्क्लेव्ह १२ आणि १३ जून २०२५ रोजी इन्स्पायर भारत या संकल्पनेतून थिंक ग्लोबल अॅट लोकल या पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या तत्त्वानुसार आत्मनिर्भर भारत विकसित भारत या दृष्टीने या आंतरराष्ट्रीय परिषदेचे चे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये सॉफ्टवेअर, हार्डवेअर कोर इंजिनिअरिंग, सायन्स अँड टेक्नॉलॉजी तसेच मल्टी डिसिप्लिनरी मध्ये मेडिकल टेक्नॉलॉजी फार्मसी बायोटेक्नॉलॉजी टेक्नॉलॉजी अशा विविध प्रकारच्या संशोधनांमध्ये शोधनिबंधामध्ये आणि स्टार्ट अपचा सहभाग असणार आहे. अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

उद्या, दि.१२ जुन २०२५ रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कुलगुरू डॉ. विद्याशंकर एस., कुलगुरू डॉ. सुनिल भिरुड, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, डॉ. आर. एस. शिंदे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, आणि इतर उद्योग व्यवसायातील नामवंत सहभागी होणार असल्याचे प्रवरा प्रिझमचे संचालक डॉ. संजय कुरकुटे यांनी सांगितले.

ग्रामीण भागात होणारी ही परिषद आगळीवेगळी ठरावी यासाठी संस्थेच्या माध्यमातून विशेष प्रयत्न सुरू आहे. यासाठी देशातील विविध संशोधकांनी आणि टेक्सास युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया आणि मलेशिया युनिव्हर्सिटी यामध्ये सहभाग घेत शोधनिबंध परिषदेकडे पाठवले झाले आहेत.

जागतिक पातळीवर होणारी ही परिषद खऱ्या अर्थाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण करणारे ठरणार आहे आणि या माध्यमातून या जागतिक परिषदेमध्ये विविध परिसंवाद चर्चासत्र होणार आहे.

या चर्चा सत्रासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर परिसरातील विद्यार्थी, संशोधक, महिला बचत गट त्याचबरोबर या परिषदेसाठी राज्यातून देशभरातून आणि परदेशातून विविध शोध निबंध सादर करण्यात येणार आहे. या परिषदेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. संजय कुरकुटे यांनी केले आहे.

# पिडीत महिलांना तात्काळ अर्थसहाय्य देण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अॅट्रॉसिटी कायदे अंतर्गत अत्याचारग्रस्तांना मिळणाऱ्या अर्थसहाय्याला विलंब होत असताना पिडीतांना तात्काळ अर्थसहाय्य मिळण्याची मागणी कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेच्या शिष्टमंडळाने प्रभारी समाज कल्याण अधिकारी देवीदास कोकाटे यांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन दिले.

अॅट्रॉसिटी कायदे अंतर्गत रामवाडी येथील पिडीत महिलांना चार महिने उलटून देखील अर्थसहाय्य मिळाले नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे यावेळी लक्ष वेधण्यात आले.

याप्रसंगी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, ज्योती घोडके, प्रमिला घोडके, कविता घोरपडे, सुशीला भालेराव, कुंदा अडागळे, नंदा इंगळे, सुमन वाघमारे, लता तिजोरे, ज्योती शेलार, कुसुम वडागळे, ताराबाई काते, उषा वडागळे, अनुसया वाघमारे, सुमन वाघमारे आदी उपस्थित होते.



चार महिन्यांपूर्वी नागापूर कॉटेज कॉर्नर परिसरामध्ये सुका कचरा गोळा करणाऱ्या रामवाडी येथील प्रमिला घोडके, ज्योती घोडके, कविता घोरपडे या कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या सभासदांना बेदम मारहाण करून जातीयवादी शिवीगाळ करण्यात आली. त्यानुसार संबंधित पोलीस स्टेशनमध्ये मारहाण करणाऱ्या व जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या विरोधात अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संघटनेच्या वतीने पिडीतांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी कागदपत्रे कार्यालयाकडे त्याच वेळेस जमा केलेली आहे. गंभीर मारहाण झालेल्या महिला दोन ते अडीच महिने घरामध्ये झोपून होत्या. आजही त्यांना काम करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

अर्थसहाय्य मिळत नसल्याबाबत विचारणा करणाऱ्या कष्टकरी, कामगार महिलांना कर्मचारी उद्धटपणे वागणूक देऊन उडवाउडवीची उत्तरे देत असल्याची तक्रार करण्यात आली. शासनामार्फत मिळणारे अर्थसहाय्य पिडीत महिलांना अजून मिळालेले नाही. महिलांवर उपचार सुरु असताना ५० टक्के अर्थसाह्य मिळणे अपेक्षित होते, परंतु चार महिने उलटून देखील कुठल्याही प्रकारची मदत समाज कल्याण विभागाकडून पिडीत महिलांना मिळालेली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

पान १ वरून | पान १ वरून | पान १ वरून

## 'राष्ट्रवादीं'नी आखली रणनीती

एकट्याने लढवायच्या की कशा, याचा विचार जिल्हा नेतृत्वाला सोबत घेऊन करू, असे शरद पवार म्हणाले. विश्वास निर्माण करण्याच काम भगिनी सुद्धा करतात. जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकेच्या निवडणुका दोन-तीन महिन्यांवर आल्या आहेत. आपल्याला ५० टक्के भगिनींना निवडून द्यायचे आहे. कर्तृत्वाचा वाटा पुरुषांचाच असतो यावर माझा विश्वास नाही. भगिनींना संधी मिळाली तर त्या सुद्धा कर्तुत्व दाखवू शकतात. उद्याच्या निवडणुकीत ५० टक्के जागा भगिनींना द्यायच्या आहेत. हा धोरणात्मक निर्णय आपण घेतला आहे. तो यशस्वी करण्याचं काम दोन-तीन महिन्यात करायचे आहे, असे आवाहनही त्यांनी केले.

## सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती द्या

महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता तथा सह सचिव संजीव टाटू आदी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील म्हणाले की, आ. डॉ. किरण लहामटे आणि आ. अमोल खताळ यांनी सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्याबाबत ज्या योजना, प्रकल्पाची कामे सुचवली आहेत. त्या योजना व कामांचा जलसंपदा विभागाने अभ्यास करावा. ज्या योजनाच्या कामांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे. त्याचे सर्व्हेक्षण करून आराखडा तयार करावा. अकोले व संगमनेर मधील सिंचन प्रकल्पांची साठवण क्षमता, प्रत्यक्ष होत असलेलला पाणी साठा याबाबतही अधिकाऱ्यांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. या बैठकीत आ. लहामटे आणि आ. खताळ यांनी उपस्थित केलेले विविध मुद्दे व कामांचा आढावा घेण्यात आला. आमदार महोदयांनी उपस्थित केलेले मुद्दे व कामे प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी या कामाचे सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार कालबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत, अशा सूचनाही जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी दिल्या. बैठकीत मेळावणे बंधारा, बिताका पाणी वळण बंधारा, भंडारदरा, शिळवंडी, बलठण, पाडोशी बुडीत बंधारे बांधणे, निमगाव भोजापूर धरण पाण्याचे योग्य नियोजन, साकुर पठार भागातील पाणी प्रश्न आणि निळवंडे डावा व उजवा कालवा यासह अन्य विषयांचाही आढावा घेण्यात आला.

## कुणाचाही बाप काढणे योग्य नाही : मुख्यमंत्री

मिळाले. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत नितेश राणेंच्या बाप वक्तव्याचा मुद्दा उपस्थित झाला. शिवसेनेच्या मंत्र्यांनी आमचा बाप बाळासाहेब ठाकरे आहेत, तुमचा कोण? असा थेट सवाल करत राणेंच्या विधानावरून नाराजी व्यक्त केली. त्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नितेश राणे यांच्याकडे नाराजी व्यक्त करत, या प्रकारचे बोलणे टाळले पाहिजे, असा सल्ला दिला. तसेच, कुणाचाही बाप काढणे योग्य नाही, संबंधित मंत्र्यांशी मी बोललो, ते म्हणाले माझा बोलण्याचा तसा अर्थ नव्हता, पण मी त्यांना सांगितले, तुमच्या मनात जो काही अर्थ असेल त्यापेक्षा जे परसेप्शन जाते ते राजकारणात महत्त्वाचे असते, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली. धाराशिव जिल्हा नियोजन समितीमधील निधीवाटपाला मिळालेल्या स्थगितीवरून भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी घटकपक्षांवर जोरदार हल्ला चढवला होता. कुणी कितीही ताकद दाखवली, कसेही नाचले तरी सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री बसलाय हे लक्षात ठेवा, अशा शब्दांत राणे यांनी स्थानिक शिवसेना नेत्यांना दम भरला होता. ''सगळ्यांचा बाप म्हणून भारतीय जनता पार्टीचाच मुख्यमंत्री बसलाय, हे सगळ्यांनी लक्षात ठेवा. कुणी कितीही ताकद दाखवली, कोणीही कसेही नाचले तरी देशात भाजपचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असल्याचं लक्षात ठेवा, अशी धमकीच नितेश राणेंनी स्थानिक शिवसेनेच्या नेत्यांना दिली होती.

## महिलांनो, स्वबळावर उभे रहाः सौ. विखे

सौ. विखे म्हणाल्या की. आपल्या कुटुंब व्यवस्थेमध्ये पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धत रूढ होती. त्यामुळे आई-वडिलांकडून मुलांना योग्य संस्कार मिळत होते. मात्र आता विभक्त कुटुंबपद्धत झाली आहे. त्यामुळे संस्कार मिळणे कठीण झाले आहे. महिलांनी एकमेकींच्या पाय खेचण्यापेक्षा एकमेकींना सहकार्य करावे. विधवा महिलेला समाजबाह्य न करता तिला मान-सन्मान द्यावा, असेही त्यांनी सांगितले. पती गेला तरी महिला कुंकू लावू शकते. कारण तीही समाजाचा भाग आहे. मुलगाच वंशाचा दिवा नाही, मुलगी सुद्धा पणती आहे अन् ती कायमप्रकाश देत असल्याचे विखे यांनी सांगितले.

## मनसेचा रेल्वे प्रशासनावर धडक मोर्चा

महामंडळ हवं, ही मागणी गेले कित्येक वर्षांपासून केली जात आहे. आम्ही सुद्धा ही मागणी केली होती, पण आजपर्यंत एकाही सरकारने या मागणीकडे लक्ष दिलं नाही. आज शहरांचं नियोजन पूर्णपणे विस्कटलं आहे. प्रचंड लोंढे येत आहेत. त्यांच्यासाठी मोठे रस्ते, ब्रिज, मेट्रो बांधली जात आहेत. उंच उंच इमारतींना परवानगी दिली जात आहे, पण पार्किंगचं काहीही नियोजन नाही. प्रत्येक शहरात ट्रॅफिकची गंभीर समस्या आहे. नवनवीन रस्ते, मेट्रो बांधून काहीही फरक पडत नाहीये, तरीही कुठलंच सरकार शहर नियोजनाचा किंवा बाहेरून येणाऱ्या लोंढ्यांचा विचार करत नाहीये. आपलं सगळं लक्ष फक्त निवडणुका आणि प्रचार यावरच केंद्रित आहे. राज ठाकरे-उद्धव ठाकरे युती करणार का? या प्रश्नापेक्षा आज मुंबईत प्रवास कसा होतोय, शहरांमध्ये आणि एकूणच राज्यात लोकं कशा अवस्थेत जगत आहेत.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# वडाऐवजी बंद पडलेल्या सिग्नलची पूजा

## जनहित परिषद आणि जागरूक नागरिक मंचचे अनोखे आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** शहरातील उघडून ठेवलेल्या रस्त्यांचा आणि वाहतूक व्यवस्थेचा जो बोजवारा उडाला आहे, त्याच्या निषेधार्थ महिलांनी काल वडाऐवजी बंद पडलेल्या सिग्नलची पूजा केली. वटपोर्णिमेनिमित्त जनहित परिषद आणि जागरूक नागरिक मंच अध्यक्ष सुहासभाई मुळे यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.



सावित्रीने सत्यवानाचे प्राण यमराजाकडून वडाच्या झाडाला संकल्पचा दोरा बांधून पुन्हा मिळवले आणि आपल्या पती देवांना जीवदान दिले. परंतु आज शहरातील माता-भगिनींना त्यांचे पतीदेव सगळीकडे उघडून ठेवलेल्या रस्त्यावरून आणि कुठल्याही चौकातले सिग्नल चालू नसताना. वाहतूक पोलीस कधीच उभे नसताना सुखरूप घरी यावेत, अशी चिंता लागलेली असते.

महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा अहिल्यानगर आणि तिथे अतिशय तुटपुंजे पोलीस बळ असतानाही शासनाचे डोळे वर्षानुवर्ष उघडत नाहीत. त्यामुळे डीएसपी चौक वगळता इतर कुठल्याही चौकामध्ये वाहतूक पोलीस देखील उभे करण्याची ऐपत प्रशासनाची नाही. कायनेटिक चौकामध्ये १५ लाख रुपये खर्च करून गेल्या दोन वर्षापासून बंद असलेल्या सिग्नलला आज वटपौर्णिमे निमित्त वडाच्या झाडाच्या ऐवजी त्या बंद सिग्नललाच काळा दोरा बांधून वटपौर्णिमा साजरी केली.

आता बंद सिग्नलला दोरा बांधला आहे. त्यानंतर मात्र संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात येऊन असेच काळे दोरे बांधायची वेळ येईल असे आंदोलन करायची प्रशासनाने वेळ आणू नये. असा इशारा जनहित परीक्षा आणि जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे, यांनी दिला. यावेळी माजी उपम हापौर गीतांजली काळे, करुणा कुकडे, मयुरी मुळे, सारिका कुकडे, युगंधरा अंतरकर, गोविंद कुकडे नागरिक उपस्थित होते.

# भूमिगत गटारयोजनेमुळे झाली रस्त्यांची दुर्दशा

## पालिकेच्या अनागोंदीविरुद्ध राहुरीत उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** कोट्यवधी रुपये खर्च करून देवळाली प्रवरा नगरपालिकेने भूमिगत गटार योजना नगरपालिका हद्दीत राबवली. त्या योजनेच्या कामामुळे रस्त्यांची अतिशय दुरावस्था झाली आहे.



ठेकेदाराने रस्ते पुन्हा तयार करून देण्याचा उल्लेख निविदेत असतानाही ठेकेदाराने रस्ते पूर्ण न करताच प्रशासनाकडून ठेकेदाराला पैसे वर्ग करण्यात आले असल्याने पालिकेच्या अनागोंदी कारभारा विरोधात देवळाली प्रवरा नगरपालिकेचे माजी नगरसेवक आदिनाथ कराळे यांनी समर्थकांसम वेत ६ जून पासून पालिकेसमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

आदिनाथ कराळे म्हणाले की, भूमिगत गटार योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराला कोणी पाठीशी घातले होते का ? काम पूर्ण झाले नाही तरीदेखील त्याच्या खात्यावर पैसे वर्ग झाले कसे? निविदा प्रक्रियेत रोडचे काम पूर्ण करून देणे असा उल्लेख असताना देखील ठेकेदाराने फक्त माती टाकून खड्डे बुजवले. त्या खड्ड्यांमुळे पावसाळ्यात गल्लोगल्ली चिखल होत असून नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

ठेकेदाराच्या व पालिकेच्या अनागोंदी कारभारा विरोधात व पालिका प्रशासनाला जाग येण्यासाठी कराळे यांनी आपल्या समर्थकांसह उपोषण सुरू केले आहे. यावेळी समीर शेख, सुभाष शेकडे, प्रशांत लोळगे, समीर शेख, चंदू चव्हाण आदिंसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# विजेच्या धक्क्याने बैलाचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** ऊसाच्या शेतात मशागत करीत असताना वीज मंडळाच्या गलथान कारभारामुळे राहुरीतील सुनील पंढरीनाथ गुलदगड या शेतकऱ्याचा जवळपास ५० हजार रुपयांचा पंढरपुरी खिलार जातीच्या बैलाचा बळी गेल्याची घटना घडली आहे.

गुरुवार दि. ५ जून रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास सुनील गुलदगड हे राहुरीतील अमोल उर्फ अण्णासाहेब अशोक तनपुरे यांच्या शेतातील उसाची अंतर मशागत करण्यासाठी गेले असताना, उसाच्या शेतातील वीज वाहिनीची तार तुटून खाली पडली होती. मशागत सुरू असताना बैलाचा पाय या तारीवर पडला. विजेचा जोरदार धक्का लागल्याने बैल जागीच गतप्राण झाला. या घटनेत गुलदगड बचावले. गेल्या अनेक दिवसांपासून या तारा खाली लोंबकळत असताना, शेतकऱ्यांनी वेळोवेळी तक्रारी केल्या, परंतू महावितरण कार्यालयाने कोणतीही दखल न घेतल्याने सदर दुर्घटना घडल्याचा आरोप परिसरातील शेतकऱ्यांनी केला आहे. या बैलाच्या जीवाची भरपाई महावितरणने करून द्यावी, त्याचबरोबर लोंबत असलेल्या विजेच्या तारांना त्वरित ताण देऊन व्यवस्थित कराव्यात, अशी मागणी राहुरीतील शेतकरी करीत आहेत.

# शेतकऱ्यांनी आता शेतात हेलिकॉप्टरने जायचे का ?



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी हद्दीतील तब्बल अडीचशे एकर शेती शिर्डी औद्योगिक वसातीसाठी अधिग्रहित झाली. या बाजूलाच खंडकरी शेतकऱ्यांनादेखील शासनाने जमिनी उपलब्ध करून दिल्या. मात्र एम आयडीसीसाठी संरक्षक भिंतीचे काम सुरू आहे. ही भिंत करत असताना अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीत जाणाऱ्या रस्त्यावरदेखील कब्जा केला आहे. शत्यामुळे शेतात हेलिकॉप्टरने जायचे का, असा संतप्त सवाल बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित केला. सोनेवाडी ते निमशेवडी हा ब्रिटिशकालीन शिवरस्ता आहे. आजही तो नकाशात आहे. असे असतानाही या रस्त्यावरच वॉल कंपाऊंड करण्याचा घाट एमआयडीसीत असलेल्या कंपनीच्या मालकांनी घातला आहे. शेतकरी आप्पासाहेब जावळे, व्यंकटराव राऊत, गणपत राऊत, जनार्धन वायसे, साहेबराव घोंगडे यांनी ही बाब इतर शेतकऱ्यांच्या लक्षात आणून दिली. सोनेवाडी येथील झालेल्या ग्रामसभेतदेखील हा विषय घेण्यात आला. सोनेवाडीची अडीचशे एकर जमीन असतानासुद्धा कुठल्याही प्रकारचा ना हरकत दाखला देखील एम आयडीसी कडून मागविण्यात आला नाही, हे दुर्दैव आहे. सरपंच शकुंतला गुडघे उपसरपंच संजय गुडघे, ग्रामपंचायत अधिकारी भानुदास दाभाडे यांनी या संदर्भात सर्व कागदपत्रे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांपर्यंत पाठवणार असल्याचे सांगितले.

# तेलीखुंटात वाहतेय मैलमिश्रित पाणी

## पाणी बंदची भाजपाचे संजय ढोणे यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तेलीखुंट चौक रस्त्यावरील ड्रेनेज लाईन वारंवार तुंबून चेंबरद्वारे मैलमिश्रित पाणी अक्षरशा रस्त्यावरून वाहते. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तसेच या परिसरातील व्यावसायिक अक्षरशः त्रस्त झाले आहे. तरी आयुक्त यशवंत डांगे यांनी लक्ष घालून हा प्रश्न तातडीने मार्गी लावून देवा अशी मागणी भाजपाचे संजय ढोणे यांनी केली

तेलीखुंट परिसरातील चेंबर मधून वाहणारे मैलमिश्रित पाणी प्रश्नाची आयुक्त यशवंत डांगे यांनी पाहणी केली. यावेळी भाजपचे संजय ढोणे, अजय ढोणे, इंजि. सुरेश इथापे, ए. के. गुगळे, दिलीप दारुणकर, अनिल मोरे, मजहर शेख, निलेश दारुणकर, विकी आव्हाड, विनायक भागवत, अभिजीत ढोणे, भारत ढोणे, धीरज गोडळकर बापू गीते, निलेश राठोड, शुभम राऊत आदी उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे यांनी तेली खुंट परिसरातील पाण्याच्या प्रश्नाची पाहणी करत हा प्रश्न तातडीने हाती घेऊन सोडवला जाईल, असे आश्वासन या परिसरातील नागरिकांना दिले.



# स्टेट बँकेच्यावतीने रक्तदान शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाला २१९ वर्ष पुर्ण होत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया चा 'सेलिब्रेशन डे' चा भाग म्हणून गेल्या ७० वर्षांपासून बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित केले जाते. यावर्षी २१९ व्या बँक वर्धापन दिनानिमित्त स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा श्रीगोंदा वतीने आज ११ जून रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले.

रक्तदान हे सगळ्यात श्रेष्ठ दान समजले जाते. कारण रक्तदान आहे, जीवनदान वाचवी दुसऱ्याचे प्राण आपल्या रक्ताच्या




थेंबाने अनेकांचे जीव वाचवले जातात. रक्तदान हे सर्वात श्रेष्ठदान मानले जाते. रक्तदान केल्याने अनेक लोकांना जीवदान मिळते. तुमच्या रक्ताचा एक थेंब इतका मौल्यवान असू शकतो याची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. म्हणून शिबिरात युवक, युवती नागरिकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करुन सहकार्य करावे असे आवाहन शाखा प्रबंधक सुदर्शनसिंह रावत यांनी केले आहे.

# एकशे एक वटवृक्षाच्या रोपांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी :** शेवगाव तालुक्यातील गोळेगाव येथील झाड फाउंडेशन गेल्या तीन वर्षांपासून गोळेगाव सह परिसरात वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून त्याचे संवर्धन केले जात आहे. वटपौर्णिमेच्या निमित्ताने झाड फाउंडेशनच्या वतीने गावातील महिला भगिनींना एकशे एक वटवृक्षाचे रोपांचे वाटप करण्यात आले.



गोळेगावच्या पूर्वेला दक्षिण उत्तर पासून चार ते पाच किलोमीटर लांबीच्या वनक्षेत्राच्या सीमेवर गावातील निवडक ठिकाणे, नदीपात्र लगत एक हजार एकशे अकरा वटवृक्षाचे त्याच बरोबर पिंपळ, उंबर, निंदर या सारख्या महावृक्षाचे रोपण करण्यात येणार असून त्याची प्रत्यक्ष सुरुवात काल गावातील महिला भगिनींचे हस्ते करण्यात आली असल्याची माहिती गोळेगावच्या सरपंच मुक्ता आंधळे यांनी दिली. यावेळी झाड फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष संजय आंधळे, झाड फाउंडेशनचे सचिव बाबा डोंगरे, सदस्य नवनाथ रासनकर, सोमनाथ आंधळे, सुरेश फुंदे, अकबर शेख, जालिंदर बर्डे, नवनाथ बर्डे, हरीचद्र आंधळे यांच्यासह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# 'संजीवनी'च्या ३०९ विद्यार्थ्यांना नोकऱ्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव:** संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाने व इतर विभाग यांच्या संयुक्तिक प्रयत्नाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील अंतिम वर्षातील सिव्हिल, मेकॅनिकल, मेकॅट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग व कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी शाखेतील तब्बल ३०९ विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतिम निकाला अगोदरच २५ पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळवून देण्यात आल्या. यात इटॉन कंपनीने सर्वाधिक म्हणजे साडेपाच लाखांचे वार्षिक पॅकेज दिले. वयाच्या १९ व्या वर्षी विद्यार्थ्यांचे नोकरदार होण्याचे स्वप्न संजीवनीने पुर्ण केले आहे, अशी माहिती संजीवनी पॉलीटेक्निकने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.इटॉन, ब्ल्यु स्टार, अलस्टेफ ग्रुप, आरडीसी कॉन्क्रीट, मायडीया, बजाज, रिंग प्लस अक्का, ओईएन, थर्म्यक्स, एल



अँड टी डीफेंस, शारदा मोटर्स, बीगॉस ऑटो, सेंट गोबिन, आयएफबी इलेक्ट्रॉनिक्स, आद्याम एनर्जी सोल्युशन्स, थॉट ब्लिस, बगबॅटलर प्रा. लि., इत्यादी कंपन्यांचे कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. संजीवनीचे अध्यक्ष नितिनराव कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेले विद्यार्थी, त्यांचे पालक, प्राचार्य ए. आर. मिरीकर, टी अँड पी विभाग प्रमुख प्रा. आय. के. सय्यद व सर्व विभाग प्रमुख यांचे अभिनंदन केले आहे.

# लौकीच्या उपसरपंचपदी साहेबराव शेळके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लौकी ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच राहुल खंडीझोड यांनी रोटेशननुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाचे किरण साहेबराव शेळके यांची बिनविरोध करण्यात आली आहे.



लौकी ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच अजिनाथ खटकाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत किरण साहेबराव शेळके यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक संकेत शिगांडे यांनी किरण शेळके यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी सरपंच, सर्व सदस्य व काळे गटाच्या कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित उपसरपंच किरण शेळके यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी मावळते उपसरपंच राहुल खंडीझोड, सदस्य कांताबाई खिल्लारी, दिपाली खटकाळे, ललिता इंगळे, अनिल आहेर, जिनींग प्रेसिग सोसायटीचे संचालक शिवाजीराव शेळके, राजेंद्र खिलारी, सावळेराम खटकाळे, भाऊसाहेब भवर, दिगंबर जाधव, बबनराव भवर, सागर खटकाळे, विष्णु खटकाळे, बाळासाहेब भवर, रामभाऊ खटकाळे, भागीनाथ शेळके, आबासाहेब जाधव, भाऊसाहेब गोडसे, कैलास शेळके, अनिल भव सतिष खटकाळे, नारायणराव शेळके आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व लौकी ग्राम स्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळसूबाईच्या पायथ्याशी केले वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम संस्थेच्या वतीने कळसूबाई शिखराच्या पायथ्याशी असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील उडदावणे येथे वृक्षारोपण करण्यात आले. युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम या सामाजिक संस्थेच्यावतीने दरवर्षी जागतिक पर्यावरण दिना निमित्त ५ जून रोजी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमतर्फे युपीएससी व स्पर्धा परीक्षा करणाऱ्या युवकांसाठी मोफत मार्गदर्शन व शिष्यवृत्ती दिली जाते. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण या क्षेत्रात वृक्षारोपण, मोफत आरोग्य शिबीर आदि उपक्रम संस्थेमार्फत केले जातात. त्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम गायकवाड यांनी केले.



वृक्षारोपण कार्यक्रमासाठी आयआरएस अधिकारी प्रितेश बावीस्कर, श्रीतेश पटेल, प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकात चव्हाण, युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमचे डॉ. विक्रम गायकवाड, डॉ समीर ननावरे, डॉ कल्पेश वाणी, डॉ. सोनल भालेराव, हेल्थ केअर मार्केटिंग असोसियशनचे श्रीकांत माने, सिद्धू चव्हाण व त्यांचे सहकारी तसेच निसर्गप्रेमी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# वांबोरीत मोबाईल शॉपी चालकास बेदम मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

राहुरी- येथे दुकान चालवायचे असेल तर तुला पैसे द्यावे लागतील, असे म्हणून आरोपीने सागर संगपाळ या मोबाईल शॉपी चालकास दमदाटी करून लोखंडी वस्तूने बेदम मारहाण केली. ही घटना ६ जून रोजी दुपारच्या सुमारास राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे घडली.

सागर मनोहर संगपाळ (वय ३३) हा तरुण राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे राहत असून त्याचे वांबोरी येथील बाजार तळावर मोबाईल शॉपी व इलेक्ट्रॉनिक्स नावाचे दुकान आहे. ६ जून रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास सागर संगपाळ हा तरुण त्याच्या दुकानात ग्राहकांना मोबाईल दाखवत असताना तेथे आरोपी आला. आणि म्हणाला, तू मला तुझ्या गल्ल्यातील पैसे दे. तेव्हा सागर संगपाळ त्याला म्हणाला, तुला कशाचे पैसे दयायचे? तेव्हा आरोपी म्हणाला, तुला येथे दुकान चालवायचे असेल तर तुला पैसे द्यावे लागतील. त्यावर सागर संगपाळ या तरुणाने त्याला पैसे देण्यास नकार दिला. त्याचा राग आल्याने आरोपीने सागर संगपाळ याला लोखंडी वस्तूने मारहाण करून जखमी केले. तेव्हा तुषार राजेंद्र दाते हा भांडण सोडविण्यासाठी आला असता, आरोपी त्याला म्हणाला, तू जर मध्ये आला तर तुला पण मारेल, तसेच सागर संगपाळ याला जिवंत सोडत नाही, अशी धमकी दिली. सागर मनोहर संगपाळ याच्या फिर्यादीवरून अमोल ऊर्फ गोट्या हिरामन चौगुले, रा. वांबोरी याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल आला आहे.

# रील बनविण्याच्या नादात तरुणास बसला गळफास

## जामखेड शहरातील घटना; दैव बलवत्तर म्हणून वाचले प्राण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** व्हिडीओ बनवून सोशल मीडियावर टाकण्यासाठी हल्लीची मुलं काहीही करायला तयार असतात. रील बनिवण्याच्या नादात अनेक तरुणांने हकनाक आपले जीव गमावले आहेत तर काही जण जखमी झाले आहेत. अशीच घटना जामखेड शहरात घडली आहे. गळफास घेण्याची रील बनविण्याच्या नादात खरोखरच गळफास बसला. मात्र वेळेवर उपचार मिळाल्याने सुदैवाने या तरुणाचे प्राण वाचले आहेत.



जामखेड जवळील जामखेड करमाळा रोडवरील खटकळीच्या रोड सोडून एक हजार फूट नाल्यात रील बनवण्याच्या नादात तरुणास गळफास बसला. सदरचा तरूण नेपाळ येथील असल्याचे समजते. सदर मुलगा गेला असल्याचे नातेवाईकांना वाटल्याने त्यांनी आरडा-ओरड केली.

घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना अनंता खेत्रे यांनी दिली. कोठारे हे आपली रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी दाखल झाले. रोड सोडून साधारण पाचशे ते सातशे मीटर आत चिखलातून जाऊन संजय कोठारी व रोहन खेत्रे आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने त्यास उचलून आणले. रुग्णवाहिकेत आणून खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. लवकर उपचार मिळाल्याने त्याचे प्राण वाचले आहेत.

या घटनेतील तरुणास इतरांच्या मदतीने हॉस्पिटलमध्ये लवकर दाखल केले व त्याचे प्राण वाचले. गळफास बसलेल्या तरुणास वाचवण्यात यश आल्याबद्दल मला केलेल्या सामाजिक कामाचे समाधान वाटत आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी व्यक्त केले.

# केडगावला विकासातून नवी दिशा देण्यासाठी कटिबद्ध

## आ. संग्राम जगताप; ओपन स्पेसमधील सांस्कृतिक भवन कामाचे भूमिपूजन व वृक्षारोपण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगाव परिसराला विकास कामाच्या माध्यमातून नवी दिशा देण्याचे काम केले आहे, सर्वांनी एकत्रित येऊन सकारात्मक ऊर्जा घेऊन विकासाचे प्रश्न मार्गी लावावे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

शहरात पूर्वी पावसाळा आला की रस्ता पॅचिंगचे काम हाती घेतले जायचे, मात्र आता कायमस्वरूपीची रस्ता काँक्रीटकरण्याची कामे मार्गी लागत आहे, सुसज्ज रस्ते आणि बहुमजली इमारती शहराच्या वैभवात भर टाकताना दिसत आहे, केडगाव हे शहराचे सर्वात मोठे उपनगर आहे, पुणे महामार्ग ते कल्याण महामार्गाला जोडणाऱ्या लिंक रोडचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे, या रस्त्यावरील जुना दगडी पुल काढून आरसीसी पुलाचे काम मार्गी लावले आहे.

### आ. जगतापांनी विकासातून केडगावचे रूप बदलले

केडगाव औद्योगिक वसाहतमधून रस्ता काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्यामुळे या परिसराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे. या ठिकाणी झाडे लावून त्याचे संवर्धन केले जाणार आहे. या परिसरातील लाईट, पिण्याचे पाणी, घंटागाडी तसेच सांस्कृतिक भवनाला संरक्षण भिंतीचे काम मार्गी लावण्याचे आश्वासन आमदार संग्राम जगताप यांनी दिले विकास कामातून केडगावचे रूप बदलले असल्याचे दिलीप दहिफळे यांनी सांगितले.

आता लवकरच या ठिकाणी पथदिवे बसविण्यात येणार असून शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लवकरच होणार आहे, आता इच्छुक लोक तुमच्याकडे येत आहे, जे पाण्याचे कनेक्शन देऊ शकत नाही ते सांगतात आम्ही कामे केली आहे.

आता ही निवडणूक पाणी, गटार, स्वच्छता, आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी होणार आहे तरी आपण काम करणाऱ्या माणसाच्या पाठीमागे उभे राहणे गरजेचे आहे, जे एल पी रेसिडेन्सी भागातील नागरिकांनी एकत्रित येऊन सांस्कृतिक भवनाचे काम सुरू केले आहे, तसेच वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन केले जावे, हाती घेतलेला उपक्रम लोक चळवळ म्हणून पुढे घेऊन जावा, असे आ. जगताप म्हणाले.

केडगाव जेएलपी रेसिडेन्सी लिंक रोड परिसरातील ओपन स्पेसमधील सांस्कृतिक भवन कामाचे भूमिपूजन व वृक्षारोपण संपन्न झाले. यावेळी आ. जगताप, सामाजिक कार्यकर्ते संभाजी पवार विशाल पवार, राजेंद्र शिंदे, उद्योजक दिलीप दहिफळे, कृष्णा लांडे, जालिंदर पालवे, शिवाजी नाईकवाडे, आप्पासाहेब गागरे, संदीप भोर, मेजर वसंत वाव्हळ, सुरेश नन्नवरे, सचिन म्हस्के आदीसह रहिवासी उपस्थित होते. दिलीप दहिफळे म्हणाले की, केडगाव जे एल पी रेसिडेन्सी लिंक रोड परिसरातील विविध विकासाची कामे आमदार संग्राम जगताप यांनी मार्गी लावले आहे, नागरिकांनी एकत्रित येऊन सांस्कृतिक भवन उभे करण्याचे काम सुरू केले आहे.

# पर्यावरण दिनी ‘वसूधैव कुटुंबकम्’चा जयघोष

## डॉ. कुंदा कवडे; अळकुटी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी जगभर ५ जून रोजी साजरा केला जातो पर्यावरणाच्या रक्षणासाठी, जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिन प्रमुख साधन मानला आहे. १९७३ मध्ये पहिल्यांदा जागतिक पर्यावरण दिन आयोजित करण्यात आला.

यावेळी सागरी प्रदूषण, जास्त लोकसंख्या, ग्लोबल वॉर्मिंग, शाश्वत उपभोग आणि वन्यजीव गुन्हेगारी यांसारख्या पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. भारतानेही जागतिक पर्यावरण दिनी वसूधैव कुटुंबकम् चा जयघोष सातत्याने चालविला आहे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले.

पद्मभूषण लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी महाविद्यालयात भूगोल विभाग व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनी पृथ्वी मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाविद्यालय परिसरात वड, पिंपळ, कडुलिंब आणि इतर वनस्पतींचे वृक्षारोपण करण्यात आले.

प्राचार्या डॉ. कुंदा कवडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. यांप्रसंगी डॉ. कवडे यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले पाहिजे, असे म्हटले.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. अमोल नालकर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. संजय जाधव, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. सुनिता जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. सचिन बलसाने आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विनायक सोनवणे, सूत्रसंचालन प्रा. सुनिता जाधव यांनी केले. तर आभार प्रा. पूजा वैरागर यांनी केले.

# कडधान्य पिकाचे करा एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन : निबे




**जनता आवाज वृत्तसेवा**

**दहिगावने :** केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चव्हाण यांच्या संकल्पनेतून विकसित कृषी संकल्प अभियान कार्यक्रम अंतर्गत दि. ४ जून रोजी नगर येथील निंबळक, इसलक व खारे कर्जुने या ठिकाणी शेतकऱ्यांना तुर, मुग उडीद या पिकांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांना मुक्त गोठा व जनावरातील रोग निर्मूलन विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कृषी विज्ञान केंद्र दहिगावने येथील नारायण निबे, सचिन बडधे, डॉ. चंद्रशेखर गवळी, प्रकाश बहिरट, कार्यक्रम सहाय्यक तसेच जेऊरच्या मंडळ कृषी अधिकारी घोरपडे, कृषी पर्यवेक्षक विजय सोमवंशी, सहाय्यक कृषी अधिकारी चैतन्य बडवे व आत्माचे सहाय्यक तंत्र व्यवस्थापन उमेश डोईफोडे उपस्थित होते.

# हॉटेल मालकाकडून आचाऱ्याला बेदम मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** एक महिना केलेल्या कामाचा पगार मागीतला म्हणून हॉटेल मालकाने हॉटेलमधील आचाऱ्याला शिवीगाळ करुन लाथा बूक्क्यांने व काठीने मारहाण केली. ही घटना राहुरी शहर हद्दीत घडली.

त्रिलोक जितसिंग सिंग चितोडगड (उत्तराखंड, हल्ली रा. शुभकिर्ती हॉटेल, राहुरी बुद्रुक, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्रिलोक सिंग हे नगर ते मनमाड रोडवरील शुभ किर्ती हॉटेल येथे साउथ इंडीयन कुक म्हणून सुमारे ४ महिन्यापासुन काम करत आहे. हॉटेल कन्हैयालाल जसविंदरसिंग कथुरिया याने चालवण्यास घेतले आहे.

दि. ६ जून २०२५ रोजी सकाळी ८ वाजता त्रिलोक सिंग हे हॉटेलवर कुकचे काम करत होते. त्यावेळी तेथे कन्हैयालाल कथुरिया हा तेथे आला व त्रिलोक सिंग यांना शिवीगाळ केली. तेव्हा त्रिलोक सिंग त्याला म्हणाले की, तुम्ही मला विनाकारण शिवीगाळ का करता. असे विचारलेचा राग आल्याने त्याने त्रिलोक सिंग यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच तू इथे कामावर राहायचे नाही, निघून जा असे म्हणाला.


त्यावर त्रिलोक सिंग त्याला म्हणाले की, माझे कामाचे तुमच्याकडे एक महीना पाच दिवसाचे २८ हजार ५०० रुपये तुमच्याकडे आहेत. ते मला दया मी तुमचे काम सोडून जातो. असे म्हणाले असता त्याने पून्हा त्रिलोक सिंग यांना शिवीगाळ केली व म्हणाला तुला तुझ्या कामाचे पैसे देणार नाही, तु माझे विरुध्द काय करायचे ते कर. असे म्हणून काठीने मारहाण केली. हॉटेलमधून धक्के देवून बाहेर काढले. तसेच तु परत येथे जवळपास दिसला तर तुझ्याकडे पाहिल, अशी धमकी दिली.

घटनेनंतर त्रिलोक जितसिंग सिंग यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी कन्हैयालाल जसविंदरसिंग कथुरिया (रा. राहुरी बुद्रुक, ता. राहुरी) याच्यावर मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# शरद पवारांच्या हस्ते ज्युनियर कॉलेज इमारतीचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आज, दि. ११ जून रोजी सकाळी १०.३० वाजता रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान संचलित विद्यानिकेतन शैक्षणिक संकुल श्रीरामपूर येथे रावसाहेब शिंदे जयंती व ज्युनियर कॉलेज नूतन वास्तूचे उद्घाटन व पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.




प्रमुख अतिथी जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था अध्यक्ष रामसिंग ठाकूर तसेच माजी मंत्री बाळासाहेब थोरात, जेष्ठ पत्रकार मधुकर भावे, व्हा. चेअरमन रयत शिक्षण संस्था भगीरथ शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

यावेळी मुख्य मार्गदर्शक एमकेसीएल विवेक सावंत यांना रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार ना. शरदराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. स्व. रावसाहेब शिंदे यांनी जीवनात समाजसेवेचा अखंड यज्ञ, सत्य सेवेचा दीपस्तंभ आणि समतेचा अटळ संकल्प स्वातंत्र्यपूर्व काळात मायभूमीच्या मुक्तीसाठी त्यांनी लढा दिला आहे. त्यानंतर विद्यार्थी शेतकरी कामगार व आदिवासी यांच्यासाठी क्रांतिकारक पाउल उचलले.

शिक्षण सहकार, न्याय आणि शेतीच्या रचनात्मक कार्यात त्यांनी आयुष्य वाहिले आहे. यासाठी भाऊसाहेब थोरात, सुमनभाई शहा आदींचे सहकार्य लाभले. २०२५ या वर्षात ही संस्था डॉ. राजीव शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात कोणतेही डोनेशन न घेता वाढवली.

या शुभारंभ व पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. प्रेरणा व राजीव शिंदे, प्राचार्य शेळके, सुखदेव सुकळे, नॅबचे अध्यक्ष भागचंद चुडीवाल, प्रकाश पाटील, डॉ. बाबुराव उपाध्ये, प्राचार्य शंकरराव गागरे आदींनी केले आहे.

# दादा जोशींचे शैक्षणिक कार्य दिशादर्शक

## रवींद्र गुलाटी; कर्मयोगी दादा जोशींचे २५ वे पुण्यस्मरण संपन्न



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहराच्या सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक जडणघडणीत कर्मयोगी दादांचे योगदान मौलिक आहे. मात्र शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य दिशादर्शक व मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन हिंदसेवा मंडळाचे उपाध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष रवींद्र गुलाटी यांनी केले.

दादा वामन जोशी मराठी शाळेत आयोजित कर्मयोगी दादांच्या २५ व्या पुण्यस्मरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, राजेंद्र जोशी, शाळेचे चेअरमन ऋषिकेश जोशी, हिंदसेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य अनिल देशपांडे, अशोक उपाध्ये, भि. रा. खटोडचे चेअरमन दत्तात्रय साबळे, सोमैया जुनियर कॉलेजचे चेअरमन जितेंद्र अग्रवाल, प्रवीण भंडारी, बालवाडी विभागाचे चेअरमन सुशील गांधी आदी उपस्थित होते.

प्रारंभी कर्मयोगी दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वैष्णवी काथे यांनी इशस्तवन सादर केले. प्रशासनाधिकारी बी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संजय जोशी, दत्तात्रय साबळे, अशोक उपाध्ये, ऋषिकेश जोशी, आदिनाथ जोशी यांनी आपल्या मनोगतामधून कर्मयोगी दादांच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सचिन मुळे, भरत शेंगाळ व शाळेच्या शिक्षक व सेवक वृंदांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, सेवकवृंद आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार मंगल वाघ यांनी केले.

# खर्डात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा तडाखा

## प्रशासनाकडून पंचनामे सुरू; शेतीपिकांचे व घरांचे झाले मोठे नुकसान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील खर्डा परिसराला वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला दिनांक ९ जून रोजी रात्री सुमारे एक तास आचाणक मोठ्या प्रमाणात वारा व पाऊस झाल्याने आनेक घरांचे पत्रे उडाले तर फळबांगांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

खर्डा येथील प्रभावती बारगजे या रहात आसलेल्या घरावरील छत उडुन गेल्याने धान्यसह संसार उपयोगी वस्तुंचे नुकसान झाले शालेय विद्यार्थीची वह्या पुस्तकेही भिजले आहेत, तसेच शिवराम बापू लोखंडे यांच्या शेतातील कंपाऊंडवर व भिंतीवर झाड कोसळल्याने कंपाऊंड व गेटचे नुकसान झाले, तर हरिदास आहेर यांच्या पपई बागेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

तसेच परिसरात आनेक ठिकाणी विजेचे खांब व तारा पडल्या होत्या तसेच मोठमोठी झाडे उन्मळून पडली आहेत, त्यामुळे खर्डा शहरासह परिसरातील विजपुरवठा खंडीत झाला आहे. याच बरोबर परिसरात आनेक ठिकाणी विविध स्वरूपाचे नुकसान झाले आहे.

प्रशासनाच्या वतीने सकाळीच पंचनामे सुरू केले आहेत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना सरपंच संजीवनी पाटील यांनी दुरध्वनीवरून झालेल्या घटनेची माहिती दिली आणि सभापती शिंदे यांनी प्रशासनाला पंचनामे करण्याचे आदेश दिले होते.

यावेळी खर्डा ग्रामपंचायतच्या सरपंच संजीवनी पाटील, तालुका कृषी अधिकारी रविंद्र घुले, शिवराम लोखंडे, ग्राम विकास अधिकारी मिसाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वैजिनाथ पाटील, केशव वनवे, मंडल अधिकारी नंदकुमार गव्हाणे, कृषी साह्यक गोपाळघरे, मंडल कृषी अधिकारी कटके, तलाठी विकास मोराळे, ग्रामपंचायत आधिकारी बहीर भाऊसाहेब यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# सेक्युलर खरा इतिहास दाबू शकत नाही

## सागर बेग; राहात्यातील नांदूर गावात अहिल्यामाता होळकर जयंती उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** ऑपरेशन सिन्दुरमध्ये हिंदूंची संख्या जिथे जास्त त्याचठिकाणी पाकिस्तानने ड्रोन हल्ले केलेले आहेत. भारतातील एकाही जिहाद्याने सिन्दुर ऑपरेशनच्या समर्थनार्थ मोबाईलवर स्टेट्स ठेवलेले नाही, इतकी कट्टरता जिहाद्यांची त्यांच्या धर्माबाबत आहे. पण अहिल्यामातेच्या जयंती निमित्ताने साजरा होणाऱ्या कार्यक्रमास महिलांची कमी संख्या ही बाब चिंताजनक असल्याचे परखड मत राष्ट्रीय श्रीराम संघाचे सागर बेग यांनी मांडले आहेत.

### प्रवृत्तीच्या लोकांना कठोर शासन करा

आपल्या हिंदूंच्या पवित्र देवतांच्या मंदिरासमोर महिला नाचवण्याचा कार्यक्रम ठेवून हिंदूंना लोकांची गर्दी करावी लागते. ही खूप लाजीरवाणी आणि शरमेची गोष्ट असल्याचे बोलून सागर बेग यांनी अशा प्रवृत्तीच्या लोकांना कठोर शासन झाले पाहिजे, असे स्पष्ट मत सागर बेग यांनी व्यक्त केले.

राहाता तालुक्यातील नांदूर गावात अहिल्यामाता होळकर जयंती समिती व श्रीरामराज्य प्रतिष्ठानच्या वतीने अहिल्यामाता जयंती कार्यक्रमाबरोबरच राष्ट्रीय श्रीराम संघ नांदूर शाखेचे उद्घाटन कार्यक्रम अध्यक्ष सागर बेग यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान खंडाळा गावचे सरपंच विशाल गोरे हे होते.



सागर बेग म्हणाले की, वामपंथीय इतिहासकारांकडून महाराजांचा खरा इतिहास लपवण्यात आला आणि खोट्या गांधी परिवाराला समोर आणण्यात आले. पण महाराजांचा खरा इतिहास हे सेक्युलर कदापीही दाबू शकणार नाही म्हणूनच आज आपल्या लाडक्या राज्यांचा खराखुरा इतिहास आपल्या समोर आहे. मागील शासनाने धर्माच्या शिक्षणापासून हिंदूंना वंचित ठेवल्यामुळे आज विधर्मी लोकं हिंदू देवदेवतांची विटंबना करत आहेत.

याप्रसंगी संध्याताई गिधाड यांचे देखील भाषण झाले. आकाश बेग, सोनू बेग यांचे सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील असंख्य ग्रामस्थांबरोबरच श्रीरामराज्य प्रतिष्ठानचे व राष्ट्रीय श्रीराम संघाचे पदाधिकारी कार्यकर्ते प्रयत्नशील होते.

खंडाळा गावचे सरपंच विशाल गोरे, उमेश गोरे, मंगेश चव्हाण, प्रदीप वराट, भाऊसाहेब वाघमारे, चेतन गायकवाड, मनोज साबळे उपस्थित होते.

# डॉ.सी.व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षेत पूर्वी प्रथम



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** जनसेवा प्रतिष्ठान अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे, श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय श्रीगोंदा येथे शिकत असलेली इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी पूर्वी संजय गारुडकर ही श्रीगोंदा तालुक्यात प्रथम आली असून तिची इस्त्रो सहलीसाठी निवड झाली आहे. श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयातील आठ विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

पूर्वीच्या या यशाबद्दल ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र नागवडे तसेच संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा नागवडे, संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड, छत्रपती शिक्षण संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, ऑडिटर सुभाष भापकर, विलास ठाणगे, शाळा समितीचे उपाध्यक्ष बबनराव आनंदकर, शाळा समितीचे सर्व सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक भिमराव आनंदकर, मार्गदर्शक शिक्षक राजेंद्र गारुडकर, सर्व शिक्षक व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रोहमारे पुरस्कारासाठी ग्रंथ साहित्य पाठवा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जवळके :** कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथील कै. भि. ग. रोहमारे ट्रस्ट तर्फे सामाजिक कृतज्ञतेच्या जाणिवेतून १९८९ पासून दरवर्षी राज्य पातळीवरील भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार देण्यात येतात. हे पुरस्कार मराठी साहित्यातील ग्रामीण कादंबरी, ग्रामीण कविता संग्रह, ग्रामीण कथासंग्रह आणि ग्रामीण साहित्य समीक्षा या ४ साहित्य प्रकारातील सर्वोत्कृष्ट ग्रामीण साहित्यकृतींनाच देण्यात येतात.

या पुरस्कारासाठी वरील प्रमाणे साहित्यकृतींचा विचार केला जाणार असून प्रत्येक साहित्य प्रकारातील सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या साहित्यकृतीस प्रत्येकी १५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र देण्यात येते.

२०२३ या वर्षापर्यंतच्या पुरस्कारांचे वितरण झाले असून २०२४ या वर्षाच्या घोषित करावयाच्या पुरस्कारासाठी दिनांक १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या काळात प्रकाशित झालेल्या ग्रामीण साहित्यविषयक ग्रंथांचाच विचार केला जाईल.या पुरस्कारासाठी ग्रामीण लेखक व प्रकाशकांनी आपल्या ग्रंथांच्या किमान तीन प्रती कार्यवाह, ग्रामीण साहित्य पुरस्कार योजना, भि. ग. रोहमारे ट्रस्ट पोहेगावद्वारा प्राचार्य, के. जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगाव जि. अहिल्यानगर या पत्त्यावर दिनांक ३० ऑगस्ट २०२५ पूर्वी पाठवाव्यात असे आवाहन भि. ग. रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे व पुरस्कार योजनेचे कार्यवाह प्रो. (डॉ.) जिभाऊ मोरे यांनी केले आहे.

# जिल्ह्यात यंदा कपाशी लागवडीवर भर

## जिल्ह्यात ५५ हजार हेक्टरवर खरिपाची पेरणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला असून काही ठिकाणी दमदार पाऊस झालेला आहे. यामुळे खरीप हंगामाच्या पेरण्यांनी वेग धरला आहे. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शेतकऱ्यांनी जिल्ह्याच्या अनेक भागात पेरण्या सुरू केल्या असून आतापर्यंत ५५ हजार हेक्टरवर पेरण्या पूर्ण झाल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली. यात सर्वाधिक ११ हजार हेक्टर क्षेत्रावर कपाशी लागवड झालेली असल्याचे सांगण्यात आले.



यंदा अहिल्यानगर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार सुरुवात केली. विशेषतः जिल्ह्याच्या दक्षिण भागात या पावसाचे प्रमाण अधिक आहे. पारनेर, नगर, श्रीगोंदा, पाथर्डी, शेवगाव, कर्जत, जामखेड आणि राहुरीच्या काही भागात या पावसाचे प्रमाण सर्वाधिक आहे. अनेक ठिकाणी गावातील ओढे, तलाव जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच तुडुंब भरले आहेत. यामुळे खरीप हंगामाला वेग आला आहे. पुढील आठ दिवसात जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पेरण्याची टक्केवारी दुप्पट होण्याचा अंदाज आहे. जिल्ह्याच्या दक्षिण भागात काही तालुक्यात ढगफुटी सदृश पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले असून याबाबतचे पंचनामे अद्याप सुरू आहेत. येत्या दोन दिवसात जिल्ह्यातील अवकाळी पावसाचा धुमाकळीची आकडेवारी समोर येणार आहे.

दरम्यान, एकीकडे पंचनामाची आकडेवारी, तर दुसरीकडे पेरणीची आकडेवारी वाढत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्ह्यात अनेक भागात बाजरी, मका, सोयाबीन यासह कपाशी लागवडीचे क्षेत्र वाढताना दिसत आहे. यंदा पुढील १० दिवसात खरीप हंगाम ातील पेरणी उद्दिष्टपैकी ५० टक्के पेरण्या उकरण्याची स्थिती आहे. अनेक ठिकाणी अद्याप पेरणीसाठी वापसा झालेला नाही. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून भाग बदल पावसाने सुरूवात केली आहे. १५ जूननंतर पावसाचा वेग वाढल्यास अनेक ठिकाणी अडचण होण्याची शक्यता देखील व्यक्त होत आहे. दरम्यान, दक्षिण जिल्ह्यात दमदार पावसामुळे बळीराजा शेतीच्या कामाम व्यस्त दिसत आहे.

### पिकानिहाय झालेल्या पेरण्या (हेक्टरमध्ये)

भात लागवड १, बाजरी १ हजार ९७१, मका २ हजार १०३, तूर ३ हजार १०७, मूग ५ हजार ६४, उडिद १६ हजार ५९८, पावसाळी भूईमूग १७, सोयाबीन १३ हजार ८२५, कापूस ११ हजार ५०२ हेक्टर लावगड अथवा पेरण्या झालेल्या आहेत.

# मनसेचे महावितरणवर आक्रमक आंदोलन

## २४ तास वीज गायब; अभियंत्यांना दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहरातील बाभळेश्वर सबस्टेशन परिसरात महावितरणच्या गलथान कारभारामुळे एकाचवेळी सहा वीज पोल कोसळल्याने संपूर्ण श्रीराम पूर शहर अंधारात गेले. तब्बल २४ तास वीजेचा पुरवठा ठप्प राहिल्यामुळे नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. या घटनेने केवळ घरगुती वापरावर परिणाम झाला नाही, तर व्यापारी, औद्योगिक, आरोग्य, शैक्षणिक क्षेत्रांनाही जबर फटका बसला. व्यापाऱ्यांचे लाखोंचे आर्थिक नुकसान झाले.



या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महावितरणच्या श्रीरामपूर कार्यालयावर धडक देत, महावितरणच्या ढिसाळ कामकाजावर जोरदार नाराजी व्यक्त करणारे आक्रमक निवेदन सादर केले. शहराध्यक्ष स्वप्निल नंदकिशोर सोनार यांच्या नेतृत्वाखाली मनसेच्या शिष्टमंडळाने हे निवेदन दिले. निवेदनात स्पष्ट शब्दांत नमूद करण्यात आले की, वीज पोल कोसळण्याच्या घटना केवळ निसर्गामुळे नाहीत तर महावितरणच्या हलगर्जीपणामुळे घडत आहेत. त्यामुळे महावितरणला नैतिक व प्रशासकीय जबाबदारी नाकारता येणार नाही, असा थेट इशारा देण्यात आला.

या निवेदनावर मनसे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, जिल्हा सचिव डॉ. संजय नवथर, जिल्हा उपाध्यक्ष सतीश कुदळे, तालुका अध्यक्ष अमोल साबने, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब ढाकणे, शहराध्यक्ष स्वप्निल सोनार, शहर उपाध्यक्ष संदीप विशबर, विद्यार्थी सेनेचे तालुका उपाध्यक्ष निखिल तोरणे, शहराध्यक्ष कुणाल सूर्यवंशी यांच्यासह यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

स्वप्निल सोनार यांनी नमूद केले की, यापूर्वीही अशा घटना घडल्या असून, फक्त माती टाकून तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती. ही तात्पुरती कामेच पुढे जीविताला धोका ठरू शकतात. म्हणूनच यापुढे अशा घटनांना आळा बसावा, यासाठी महावितरणने पावसाळ्यापूर्वी संपूर्ण शहरातील वीज पोल आणि वायरिंग यंत्रणेचे सर्वेक्षण तातडीने करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

# माऊली आश्रमातील त्रिदिनी सोहळ्याची सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील पिचडगाव येथील माऊली आश्रमात आयोजित त्रिदिनी सोहळ्याची सांगता भगवान महाराज जंगले यांच्या किर्तनाने झाली.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी विश्वालाच घर मानले असल्याने चराचरात वास्तव्य असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊलींचे अंतः करण हे विश्वव्यापक असल्याचे प्रतिपादन भगवान महाराज जंगले शास्त्री यांनी यावेळी झालेल्या कीर्तन सोहळ्यात बोलताना केले.

माऊली हे प्राणप्रतिष्ठाच्या निमित्ताने अधिष्ठानावर विराजमान झाले असल्याचे सांगत मायबाप असलेल्या संतांनी दिलेल्या उपदेशाचे पालन करा, संतांच्या संगतीत राहून परमार्थ करून मनुष्य जीवाचा उद्धार करा, असे आवाहनही त्यांनी केले. अंबऋषी संस्थानचे महंत कृष्णागिरी महाराज, देविदास महाराज म्हस्के, सुनीलगिरी महाराज, महाराज, रमेशानंदगिरी गणेशानंदगिरी महाराज, अंकुश महाराज जगताप, आवेराज



महाराज यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने आशीर्वादरुपी शुभेच्छा दिल्या.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, सीताराम महाराज पठाडे, रामनाथ महाराज पवार, चांगदेव महाराज काळे, विजय महाराज पवार, संतसेवक लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, समाधान महाराज कन्हेरकर, किरण महाराज डीवरे, सरपंच पोपटराव हजारे, भगवानराव शेजूळ, अशोक निपुंगे, दत्तात्रय कोळेकर, रामकृष्ण कांगुणे, पोलीस पाटील अनिल लहारे, माऊली आश्रम भक्त परिवारातील सदस्य, पिचडगाव येथील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसटीमधून उतरण्यासाठी १०० रुपयांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**


**पाथर्डी :** बीड ते पुणे प्रवास करणाऱ्या एका विवाहितेला रक्तदाबाचा त्रास झाल्याने तिने बस थांबवण्याची विनंती केली, मात्र वाहकाने १०० रुपये न दिल्यास बस न थांबवण्याची अरेरावी केली. बुधवार, ४ जून रोजी घडलेल्या या धक्कादायक घटनेने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

शहरातील एका प्रतिष्ठित कुटुंबातील ही महिला आपल्या दोन लहान मुलांसह सकाळी ११ वाजता पाथर्डी बसस्थानकातून बीड-पुणे (क्र. एमएच १२ एयू २५३५) या एसटी बसमध्ये स्वार झाली. तिने पाथर्डी ते पुणे असा प्रवास तिकीटही काढले. मात्र, तिसगावजवळ तिला अचानक रक्तदाबाचा त्रास जाणवू लागला आणि चक्कर येऊ लागली. तिने वाहकाला तातडीने बस थांबवण्यास सांगितले, कारण तिला उपच-ाराची गरज होती. परंतु, वाहकाने तिकीट असूनही १०० रुपये देण्याची मागणी केली आणि बस थांबवण्यास नकार दिला.

महिलेने हा प्रकार तिच्या पतीला फोनद्वारे कळवला. पतीने तातडीने स्वतःचे वाहन काढून बसचा पाठलाग सुरू केला. दरम्यान, करंजी गावापर्यंत वाहकाने बस थांबवली नाही, अखेर करंजी घाट संपल्यानंतर महिलेने नाईलाजाने वाहकाला १०० रुपये दिले. त्यानंतरच वाहकाने बस थांबवली आणि तिला तिच्या दोन मुलांसह खाली उतरवले. काही वेळातच तिचे पती घटनास्थळी पोहोचले आणि तिला पाथर्डीतील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या घटनेमुळे महिलेच्या कुटुंबाला प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला. वाहकाच्या या अमानवीय वर्तनाविरोधात कुटुंबाने कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणाने एसटी सेवेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# डॉ. तनपुरेंच्या पुण्यतिथीनिमित्त आज आरोग्य शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील श्री विवेकानंद नर्सिंग होमच्यावतीने राहुरी तालुक्याचे भाग्यविधाते कै. डॉ. दादासाहेब तनपुरे यांचा पुण्यतिथीनिमित्त सर्वरोग निदान, मुळव्याध, सांधेवात, स्त्रीरोग व नेत्ररोग शिबीराचे आज दि. ११ जून रोजी सकाळी राहुरी फॅक्टरी येथे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन राहुरी बाजार समितीचे सभापती व डॉ. तनपुरे कारखान्याचे ज्येष्ठ संचालक अरूण तनपुरे यांच्या हस्ते होणार आहे. या शिबिरात संडासद्वारे रक्त पडणे, कोंब येणे, वेदना होणे आदी लक्षणे असल्यास क्षारसुत्र पध्दतीने शस्त्रक्रिया केली जाईल. तसेच हार्निया, हायड्रोसिल, अॅपेडिंस, मुतखडा, स्त्रीयांच्या पिशवीच्या शस्त्रक्रिया तसेच स्त्रीयांचे इतर आजार, सांधेवात, मणक्याचे व हाडांचे इतर आजार, त्वचाविकार, दमा, हृदय रोग, पांढरे कोड, मधुमेह, पॅरालेसिस, सोरायसिस, डोळ्यांचे नंबर काढणे, डोळ्याचे शस्त्रकर्म व इतर आजारांवर तज्ञ डॉक्टर्स मार्फत परिक्षण व उपचार केले जातील. तरी या शिबिराचा गरजू रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सर्व अधिकारी, शिक्षक, डॉक्टर्स, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

# महिलांनी केला वटपौर्णिमा सण साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील महिलांनी पती परमेश्वरास दीर्घायुष्य लाभावे व सात जन्मी हाच पती मिळावा, हे मागणे घेऊ सुवासिनी म हिला वडाच्या झाडाला साक्षी मानून दोरा बांधून फेऱ्या घालतात. यासाठी नवनवीन वस्त्रालंकार परिधान केलेल्या सुवासिनींनी वटवृक्षाची मनोभावे पूजा करून वट सावित्रीचा सण मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला.

वटपौर्णिमानिमित्त वडाच्या झाडाची पुजा करण्यासाठी काल सकाळपासून पारनेर तालुक्यातील अळकुटी, निघोज, देवीभोयरे, वडझिरे, कान्हुर पठार, पारनेर, सुपा, टाकळी ढोकेश्वर, भाळवणी, ढवळपूरीसह तालुक्यात विविध भागात सुवासिनींची गर्दी दिसून येत होती. ज्या भागात वटवृक्ष उपलब्ध नाही, अशा महिलांनी प्रतिकात्मक वडाच्या झाडांची डाहाळयाची देखील पुजा केली. वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिलांनी आज दिवसभर गर्दी दिसून येत होती. काही महिला वडाच्या झाडाला दोरा बांधतात तर काही महिला वटवृक्षाला नैवेद्य ठेवताना दिसून येत होत्या, असे चित्र तालुक्यात सर्वत्र दिसत होते.वटपौर्णिमेच्या सणाला आंबा फळा ला विशेष महत्त्व असते. पुजा विधी व खास जेवणासाठी आमरसासाठी आंब्याला मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने आज आबांचे दर वाढलेले होते.

# मुसळवाडी तलावात मुबलक पाणीसाठा

## खरिप हंगाम सुखकर होण्याचे संकेत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी तालुक्याच्या पूर्व भागातील सुमारे २० ते २५ गावांना जलसंजीवनी देणाऱ्या मुसळवाडी तलावाची जलसाठवण क्षमता १८९ एमसीएफटी असून, आज अखेर ८७.२७ दशलक्ष घनफूट म्हणजेच ४४ टक्के जलसाठा शिल्लक असल्याची माहिती अहिल्यानगर पाटबंधारे विभागाने दिली आहे.

मागील वर्षी निसर्गाच्या कृपेने मुळा धरण व भंडारदरा धरण शंभर टक्के भरले होते. त्यामुळे पाटबंधारे विभागाने मुळा व भंडारदरा धरणातून मुसळवाडी तलावही शंभर टक्के भरून दिला होता. मुसळवाडी तलाव भरल्यानंतर पाटबंधारे विभागाच्या वतीने वर्षभरातील शेतकऱ्यांच्या पाट पाण्याचे व पिण्याचे पाण्याचे योग्य नियोजन करण्यात आले.



यंदा मुसळवाडी तलावात मुबलक पाणी असल्याने वर्षभरातील शेती पिकांचे नियोजन या भागातील शेतकऱ्यांनी केले होते. तसेच तलावावरील सुमारे २० ते २५ गावातील ग्राम स्थांना वर्षभर पिण्याचे पाणी पुरवले.

मुसळवाडी जलाशयातून या हंगामामध्ये चार आवर्तन शेती पिकांसाठी देण्यात आली. यंदा मुबलक पाणीसाठा असल्याने कडक उन्हाळा असूनही पाणीटंचाई जाणवली नाही. तसेच सध्याचा उपलब्ध पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी ठेवण्यात आला असल्याचे कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे, उपअभियंता ए. एच. गीते, शाखाधिकारी सुधाकर सुरुणकर, जी.एन. सिनारे यांनी माहिती दिली.

दरम्यान यावर्षी मे महिन्यातच दमदार पाऊस झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी खरिपातील हंगामात मोठ्या प्रमाणात कपाशी लागवडी केल्या असून सोयाबीन व मका पिकाचे क्षेत्रही मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचा अंदाज आहे.

### या गावांना होतो लाभ

मुसळवाडी जलाशयातून पाणीपुरवठा करणाऱ्या मुसळवाडीसह नऊ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो. टाकळीमिया, मोरेवाडी, लाख, दरडगाव, जातप, त्रिंबकपूर, महाडूक सेंटर, माहेगाव, मालुंजे खुर्द, महालगाव, खुडसरगाव, पाथरे खुर्द, शेनवडगाव, कोपरे, वांजुळपोई, तिळापूर, बोरीफाटा आणि मांजरी आदी गावांचा यामध्ये समावेश आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** जुनी अध्ययन अध्यापन प्रक्रिया सोडून नवीन तंत्रज्ञानावर अध्यापन व्हावे, या हेतूने रयत शिक्षण संस्थेने आपल्या सर्व शाखांमध्ये आधुनिक शिक्षणाचे पाऊल ओळखत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानयुक्त शिक्षण सुरू करण्यासाठी प्रत्येक शाखातून प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली आहे.


आधुनिक काळाची गरज ओळखून तसेच विद्यार्थ्यांना भविष्यात तंत्रज्ञानावर आधारित चांगल्या नोकरीच्या संधी प्राप्त व्हाव्यात, या हेतूने संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सूचनेनुसार व चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व माहिती व्हावी, या उद्देशाने संस्था पातळीवर हे प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये या सहशालेय उपक्रमाची अंमलबजावणी होणार आहे. सदरचे प्रशिक्षण संस्था अंतर्गत विशेष प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांकडून इतर शिक्षकांना दिले जाणार आहे.

उत्तर विभागीय कार्यालयामधील एकूण ८३ शाखांमधील गुरुकुल व मिनी गुरुकुल शाखेतील शिक्षकांना हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. काही मिनी गुरुकुल शाखातील शिक्षकांना शेजारच्या गुरुकुल शाखांम ध्ये हे प्रशिक्षण घ्यावे लागणार आहे. रयतचे सचिव विकास देशमुख, उच्च शिक्षणचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव माध्यमि क बी. एन. पवार, सहसचिव ऑडिट डॉ. राजेंद्र मोरे, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे व विभागीय गुणवत्ता कक्ष मार्गदर्शक यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण विभागीय पातळीवर आयोजित केले आहे.




# रक्ताभिसारणातील अडथळ्यांमुळे आजारांना निमंत्रण

**निरोगी आणि तंदुरुस्त व्यक्ती म्हणजे ज्याचे रक्त परिसंचरण चांगले काम करत आहे. जर एखाद्या व्यक्तीचे रक्ताभिसरण खराब असेल, तर रक्त आणि ऑक्सिजन शरीरात योग्यरित्या पोहोचत नाही आणि त्यामुळे त्या व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ लागते.**



|| डॉ. दत्तात्रय मुळे ||

रक्ताभिसरणात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला तर अनेक आजार होऊ शकतात. एवढेच नाही तर शरीरातील ऊती, पेशी आणि अनेक अवयवांवर याचा मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. खराब रक्ताभिसरणामुळे शरीरात ऑक्सिजनच्या कमतरतेसोबतच अनेक पोषक घटकही कमी होऊ लागतात. खराब रक्ताभिसरणामुळे शिरा आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित रोगांचा धोका लक्षणीयरित्या वाढतो. खराब रक्ताभिसरणामुळे हृदय, मेंदू आणि पायांच्या नसांवरही मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. हृदयविकार आणि कर्करोगापेक्षा रक्ताभिसरण प्रणालीचे आजार अधिक सामान्य आहेत. ब्रिटनमध्ये सुमारे ४० लाख या मुळे त्रासलेले आहेत. तसेच, दरवर्षी ४० टक्के लोकांचा या आजारामुळे मृत्यू होतो.

रक्ताभिसरण खराब होण्याचे मुख्य कारण म्हणजे शिरांमध्ये चरबी किंवा प्लेक जमा होणे. त्यामुळे रक्ताभिसरण बिघडू लागते. या वेळी प्लेक फुटल्यास रक्त गोठते. रक्त गोठल्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. खराब रक्ताभिसरणामुळे मेंदूपर्यंत रक्त योग्य प्रकारे पोहोचत नाही. त्यामुळे नंतर स्ट्रोक होऊ शकतो. पायांमधील रक्तवाहिन्या अरुंद झाल्यामुळे पायांमधील रक्त परिसंचरणदेखील बिघडू शकते. अशा रक्तवाहिनीशी संबंधित रोग पीएडी म्हणून ओळखले जातात. त्यामुळे दुखापत, इन्फेक्शन, अल्सरचा धोका लक्षणीय वाढतो. खराब रक्ताभिसरणामुळे त्वचेलादेखील नुकसान होऊ शकते. शरीराच्या अवयवांमध्ये रक्त नीट पोहोचत नाही, तेव्हा अनेक ठिकाणी केस गळायला लागतात. अशा परिस्थितीत रक्ताभिसरणाची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. पायांच्या पेशी आणि ऊतींपर्यंत रक्त योग्य प्रकारे पोहोचत नाही, तेव्हा त्वचा कोरडी होऊ लागते.

निरोगी व्यक्तीमध्ये नवीन पेशी वेगाने तयार होतात तर रक्ताभिसरणात अडथळे असलेल्या लोकांमध्ये तुलनेने कमी प्रमाणात पेशी तयार होतात. हात आणि पाय थंड पडणे म्हणजे खराब रक्त परिसंचरण दर्शवतात. याचा स्पष्ट अर्थ असा आहे, की रक्त शरीराच्या अवयवांमध्ये पाहिजे तसे पोहोचत नाही. मुंग्या येणे हे त्याचेच लक्षण आहे. अशा वेळी अनेक वेळा रक्ताभिसरण थांबल्यासारखे वाटते. वारंवार मुंग्या येत असतील, तर रक्ताभिसरण सुरळीत आहे की नाही हे पाहण्यासाठी तपासणी करणे आवश्यक आहे.

# मायोपियाचे वाढते प्रमाण

गेल्या काही वर्षांपासून शहरी मुलांमध्ये मायोपियाच्या आजारामध्ये सातत्याने वाढ होत आहे. १९९९ मध्ये ५ ते १५ वर्षे वयोगटातील शहरी मुलांमध्ये मायोपियाचे प्रमाण ४.४ टक्के होते, ते २०१९ मध्ये २१.१ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.



दरवर्षी ०.८ टक्क्यांच्या प्रमाणानुसार शहरी मुलांमध्ये मायोपियाचे प्रमाण वाढेल असे सूचित करतात. म्हणजेच २०३० मध्ये ३१.८९ टक्के, २०४० मध्ये ४० टक्के आणि २०५० मध्ये ४८.१ टक्के होईल. याचा अर्थ असा आहे, की भारतातील प्रत्येक दोन मुलांपैकी एक बालक येत्या २५ वर्षांमध्ये मायोपियाने ग्रस्त असेल. सध्याच्या चारपैकी एकाला मायोपिया प्रमाणापेक्षा जास्त आहे. बैठी जीवनशैली, दीर्घकाळ स्क्रीनचा वापर आणि बाह्य क्रियाकलाप कमी यामुळे मुलांमध्ये मायोपियाच्या प्रकरणांमध्ये झपाट्याने वाढ होते आहे. या वाढत्या समस्येची मूळ कारणे खूप आहेत. स्क्रिनवरील अधिक वेळ मुलांच्या डोळे, रेटिना आणि मेंदूला उत्तेजित करतो. त्यामुळे बुबुळाच्या जलद वाढीमुळे मायोपिक बदलांना गती मिळते. याव्यतिरिक्त, घराबाहेर स्वच्छ सूर्यप्रकाशात फिरणे नसल्याने मुलांना डोळ्यांच्या निरोगी विकासासाठी आवश्यक असलेला नैसर्गिक प्रकाश मिळू शकत नाही.


|| डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे ||

रुग्णांचा वयोगटही आता गेल्या काही वर्षांमध्ये बदलताना दिसून येतोय. डोळ्यांच्या तपासणीसाठी लहान मुले वारंवार येत असल्याचे दिसत आहे. त्यातील अधिकाधिक मुलांना मायोपिया आहे. २०१७ मध्ये, मुंबईतील शहरी झोपडपट्टी भागातील ३–१५ वयोगटातील एक हजार मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात दोनशे मुलांना मायोपिया असल्याचे आढळून आले. मुलांमध्ये मायोपियाची लक्षणे ओळखून वैद्यकीयदृष्ट्या झटपट उपचार करणे महत्त्वाचे आहे. लक्षणांमध्ये अस्पष्ट दृष्टी, दूरच्या वस्तू पाहण्यात अडचण, डोळ्यांवरील ताण, डोकेदुखी आणि थकवा विशेषतः दीर्घकाळ स्क्रिन वापरल्यानंतर यांचा समावेश होतो. ही स्थिती बरी होऊ शकत नसली, तरी चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्सच्या मदतीने फरक पडू शकतो. वयाच्या १९ वर्षांनंतर लेझर दृष्टी सुधारणा उपचारदेखील निवडला जाऊ शकतो; परंतु डोळ्यांची नियमित तपासणी करणे, स्क्रिनवरील वेळेचा समतोल राखण्यासाठी मुलांना घराबाहेर स्वच्छ सूर्यप्रकाशात क्रियाकलापांसाठी प्रोत्साहित करणे आणि मायोपियाची पुढील प्रगती मंदावण्यासाठी एट्रोपीन आय ड्रॉप्स किंवा मायोपिया कंट्रोल ग्लासेस सारख्या वैद्यकीय उपचारांचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

# वारंवार नैराश्य येते, सावधान!

|| डॉ. गिरीश कुलकर्णी ||

मानसिक आरोग्य हे आजचे सर्वात मोठे आव्हान आहे. याबद्दल माहिती नसल्यामुळे, बहुतेक लोक नकळत बेफिकीर होतात. त्यामुळे ही समस्या दीर्घकाळ टिकून राहते आणि नैराश्याचे रूप धारण करते. नैराश्य ही अगदी सामान्य मानसिक समस्या असली, तरी त्यावर वेळीच उपचार न केल्यास ते प्राणघातकही ठरू शकते. मेंदूमध्ये सेरोटोनिन हार्मोन कमी प्रमाणात बाहेर पडल्यास नैराश्याची समस्या उद्भवते. नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीचे वर्तन बदलू लागते. १४ दिवस सतत वाईट वाटणे, नकारात्मक विचार येणे ही नैराश्याची लक्षणे आहेत. कोणतेही काम नीट करू शकत नाही आणि नेहमी एकटे राहणे पसंत करतात. हा नैराश्याचा शेवटचा टप्पा मानला जातो. तो खूप धोकादायक आहे. कामाचा जास्त ताण किंवा काही दुःखद घटनेमुळे व्यक्ती नैराश्यात जाऊ शकते. सुरुवातीला वागणे बदलते, पूर्वीसारखे काहीही काम होत नाही. स्वतःशी असलेली जगण्याची ओढही कमी होऊ लागते. या वेळी व्यक्तीच्या प्रकृतीची काळजी न घेतल्यास त्याचे मानसिक स्वास्थ्य बिघडू लागते आणि तो शेवटच्या टप्प्यात पोहोचू शकतो. नैराश्याच्या शेवटच्या टप्प्यात विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता कमी होते. स्वतःवर नियंत्रण राहत नाही. अशा परिस्थितीत एखादी व्यक्ती स्वतःचे नुकसान करू शकते, इतकेच नाही तर आत्महत्यादेखील करू शकते. जगभरात नैराश्य हे आत्महत्येचे सर्वात मोठे कारण आहे. या स्थितीत ती व्यक्ती स्वतःला नालायक समजते. अनेक वर्षे मानसिक आजाराशी झुंज दिल्यानंतर, आशा संपुष्टात येतात. जीवनाचा अर्थ समजत नाही आणि ती व्यक्ती आत्महत्या करते. नैराश्यावर उपचार करणे खूप सोपे आहे; मात्र हा आजार समजून डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्यावा. नैराश्याची लक्षणे दिसल्यास, जवळच्या व्यक्तींशी म्हणजे कुटुंब किंवा मित्रांशी बोलले पाहिजे. मानसिक समस्या त्यांच्याशी शेअर करा. डॉक्टरांकडून समुपदेशन आणि औषधे घ्या, आवश्यक उपचार करा. यामुळे नैराश्य दूर होऊ शकते.



# सिझनल अफेक्टिव्ह डिसऑर्डरविषयी...

|| आरोग्यमंत्र ||

मानसिक विकारांचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी एक म्हणजे सिझनल अफेक्टिव्ह डिसऑर्डर (एसएडी). या विकारात वर्षाच्या एका विशिष्ट काळात किंवा हंगामात रूग्णाला नैराश्य येतं. त्यातही हिवाळ्यात या विकाराची तीव्रता वाढते. एसएडी हा मूडशी संबंधित विकार आहे. या विकारात रूग्णाचा मूड सातत्याने बदलत राहतो. उत्साह आणि ऊर्जेची कमतरता, मूड चांगला नसणं, सतत झोप येणं, भूक लागणं ही या विकाराची लक्षणं आहेत. हा विकार झालेल्या रूग्णांना हिवाळ्यात नैराश्य येतं तर वसंत ऋतूत खूप उत्साही आणि आनंदी वाटतं. काही प्रसंगी उन्हाळ्यात रूग्णांना नैराश्य येऊ शकतं. काही वर्षांपूर्वीपर्यंत एसएडीची गणना दुर्मीळ विकारांमध्ये होत असे. पण आता हा विकार मोठ्या प्रमाणावर आढळतो.

ऋतूमानानुसार होणाऱ्या या विकारात हिवाळ्यात नैराश्य येत असलं किंवा उन्हाळ्यात निराश वाटत असलं तरी लक्षणं सर्वसाधारणपणे सारखीच असतात. याला ऋतूमानानुसार होणारा मूडबदल असंही म्हणता येईल. ऋतूबदलाच्या काळात या विकाराची सौम्य लक्षणं दिसू लागतात. पण कालांतराने ही लक्षणं तीव्र होत जातात. दिवसभर निराश, हताश वाटणं, उत्साह न वाटणं, कशातही रस वाटणं, शारीरिक ऊर्जा कमी होणं, झोप न लागणं, भुकेशी संबंधित समस्या, लक्ष्य केंद्रित करताना अडचणी येणं, आयुष्याला काही अर्थ नाही अशी भावना दाटून येणं,अपराधी वाटणं, मृत्यू आणि आत्महत्येचे विचार मनात येणं ही या विकाराची लक्षणं आहेत. हिवाळ्यात होणाऱ्या एसएडीमध्ये खूप झोप येणं, भुकेच्या पद्धतीत बदल होणं, कर्बोदकयुक्त पदार्थांचं अतिसेवन, वजन वाढणं, थकवा येणं, ऊर्जेची कमतरता जाणवणं अशी लक्षणं आढळतात तर भूक मंदावणं झोप न येणं, वजन कमी होणं, चिंता–काळजी ही उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या 'सॅड'मागील लक्षणं आहेत.

'सॅड'मागची नेमकी कारणं माहीत नसली तरी जनुकीय कारणांमुळे हा विकार होऊ शकतो. हिवाळ्यातलं सूर्यप्रकाशाचं कमी प्रमाण हे या काळातल्या सॅडचं प्रमुख कारण असू शकतं.



सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे शरीराचं चक्र विस्कळीत होतं आणि नैराश्याची भावना दाटून येते. सेरोटॉनिन हे मानवाच्या शरीरातलं अत्यंत महत्त्वाचं रसायन आहे. सेरोटॉनिनचं प्रमाण कमी झालं की नैराश्य येऊ शकतं. ऋतूबदलामुळे शरीरातल्या मेलाटॉनिनचं प्रमाण कमी होऊ शकतं. झोपेचं चक्र आणि मूडवर या रसायनाचा परिणाम होतो.

एसएडी या विकाराचं प्रमाण तरूण वयातल्या प्रौढांमध्ये जास्त आहे. कुटुंबात नैराश्य किंवा इतर मानसिक विकारांचा इतिहास असेल तर एसएडी उद्‌भवण्याची शक्यता वाढते. इतर मानसिक विकार किंवा तीव्र स्वरूपाचं नैराश्य असलेल्या व्यक्तीमध्ये एसएडीची तीव्र स्वरूपाची लक्षणं दिसू शकतात. या विकाराच्या लक्षणांवर तातडीने उपचार घेणं गरजेचं आहे. योग्य उपचारांअभावी रूग्ण सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होत नाही, लोकांमध्ये मिसळणं टाळू शकतो. दैनंदिन कामांमध्ये अडचणी येऊ शकतात. कामावर लक्ष केंद्रित करता येत नाही. अभ्यासावर परिणाम होतो. ताण, चिंता, काळजी वाढते. वेळेत उपचार झाले तर रूग्ण या विकारातून बाहेर पडू शकतो.

# हात कसे धुवायचे?

|| आपण कुठे चुकतो? ||

हातांच्या स्वच्छतेकडे आपण बरेचदा दुर्लक्ष करतो. पण हे हातच आपल्याला आजारी पाडू शकतात. हातावर बरेच जंतू असतात. अस्वच्छ हातांनी खाल्ल्यावर हे जंतू पोटात जातात आणि आपण आजारी पडतो. हे टाळण्यासाठी हात स्वच्छ धुणं गरजेचं आहे. हात धुण्याची विशिष्ट पद्धत आहे. त्यातच नकळत होणाऱ्या काही चुकांमुळे जंतू हातांवरच राहतात किंवा इतर मार्गांनी परत येतात. हात धुण्याची कृती अत्यंत साधी असली तरी आरोग्याच्या दृष्टीने ती खूप महत्त्वाची आहे. म्हणूनच ही कृती करताना कोणती काळजी घ्यायला हवी या विषयी...

* हात स्वच्छ धुतल्यानंतर आपण ओल्या हातांनीच नळ बंद करतो. यामुळे नळावरचे जंतू पुन्हा हातांना लागतात. हे टाळण्यासाठी नळ बंद करण्यासाठी टिश्यू किंवा रूमालाचा वापर करा.



* किमान २० सेकंद हात धुवायला हवेत.
* नळाच्या धारेखाली हात धरून ते ओले करून घ्या. यानंतर नळ बंद करा. हातांना साबण लावा. हात नीट खसखसून घासा. आता नळाखाली हात धरून ते स्वच्छ धुवा. स्वच्छ टॉवेल किंवा रूमालाने हात पुसून घ्या. रूमाल नसेल तर एअर ड्रायरचा वापर करा.
* तुम्ही हँड सॅनिटायजर वापरत असाल तर हात पूर्णपणे कोरडे होईपर्यंत एकमेकांवर घासा. अल्कोहोलयुक्त हँड सॅनिटायजरचा वापर करा. हँड सॅनिटायजरमध्ये किमान ६० टक्के अल्कोहोल असायला हवं.
* एअर ड्रायरने हात वाळवताना एकमेकांवर घासू नका. एअर ड्रायरमुळे हातांवर जंतूंचं प्रमाण वाढू शकतं. ओल्या हातांवर जंतू खूप लवकर पसरतात.
* फक्त हातांचे पंजे स्वच्छ करू नका. नखं, बोटांच्या मधला भाग तसंच हातांचा मागचा भागही नीट स्वच्छ करा.

# कर्करोगाला निमंत्रण

|| डॉ. सतीश सोनवणे ||

अनेक हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये तेच तेल पुन्हा वापरले जाते. इतकेच नाही तर घरांमध्येसुद्धा एकदा वापरलेले तेल पुन्हा वापरले जाते; मात्र ही सवय आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. वनस्पती तेल वारंवार गरम केल्याने गंभीर नुकसान होऊ शकते. अलीकडेच, 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल रिसर्च'ने भारतीयांसाठी सुधारित आहारविषयक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये वनस्पती तेल वारंवार गरम केल्याने विषारी टॉक्सिक तयार होतात. त्यामुळे हृदयविकार आणि कर्करोगाचा धोका वाढतो. स्वयंपाक करताना भाज्यांसाठी तेलाचा पुनर्वापर करण्याची प्रथा घर आणि हॉटेल–रेस्टॉरंट या दोन्ही ठिकाणी सामान्य आहे. ते हानिकारक टॉक्सिक निर्माण करतात. त्यामुळे चिंताजनक आरोग्य स्थिती निर्माण होऊ शकते.



वनस्पती तेल वारंवार गरम केल्याने पी.यू.एफ.ए.चे ऑक्सिडेशन होते आणि हानिकारक, विषारी टॉक्सिक तयार होतात. त्यामुळे हृदयरोग आणि कर्करोगाचा धोका वाढू शकतो. उच्च तापमानात, तेलातील काही चरबी ट्रान्स फॅट्समध्ये बदलतात. ट्रान्स फॅट्स ही हानिकारक चरबी असते. त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. तेल पुन्हा वापरतात, तेव्हा ट्रान्स फॅटचे प्रमाण वाढते.

या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये, 'आयसीएमआर'ने तेलाचा पुनर्वापर कसा आणि किती काळ करता येईल, हे देखील सांगितले आहे. एखादा पदार्थ तयार करण्यासाठी उरलेले तेल एक–दोन दिवसांत वापरावे. घरांमध्ये एकदा तळण्यासाठी वापरण्यात आलेले तेल गाळून पदार्थांमध्ये वापरावे. याशिवाय अशा तेलांचा वापर एक–दोन दिवसांमध्येच करावा.

# अतिरिक्त ऑक्सिजनचं सेवन?

|| विचारा प्रश्न ||

मी ४१ वर्षांचा पुरुष असून माझं वजन ७५ किलो आहे. प्रदूषणाच्या दुष्परिणामांबद्दल मी ऐकून आहे. हे दुष्परिणाम कमी करण्यासाठी घरात ऑक्सिजन सिलेंडर ठेवणं योग्य ठरेल का? त्याचा वापर कसा करायचा? किती प्रमाणात करायचा? ऑक्सिजन सिलेंडरचे काही दुष्परिणाम आहेत का?

**उत्तर** : रक्तातल्या ऑक्सिजनचं प्रमाण कमी झालं तरच कृत्रिम ऑक्सिजनचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो. प्रदूषणाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी ऑक्सिजन घरात ठेवल्याने काही साधेल असं मला वाटत नाही. प्रदूषणाच्या गंभीर परिणामांपासून वाचण्यासाठी धूळ आणि धूर यापासून लांब रहायला हवं. आपल्या आसपासचं वातावरण शुद्ध करण्यासाठी घराजवळ झाडं लावता येतील. हवा शुद्ध करणारी रोपटी तुम्ही लावू शकता. घरात हवा खेळती राहण्यासाठी प्रयत्न करा. फुफ्फुसात जाणारी धूळ ऑक्सिजनमुळे रोखली जाणार नाही. फुफ्फुसाचे विकार झालेल्या रूग्णांचा प्रदूषित घटकांशी संपर्क आल्यानंतर त्यांच्या शरीरातल्या ऑक्सिजनचं प्रमाण कमी झालं आणि श्वास घ्यायला त्रास होत असेल तर कृत्रिम ऑक्सिजनची गरज लागते. कृत्रिम ऑक्सिजनमुळे अशा रूग्णांना मदत मिळते.



|| नवसंशोधन ||

## मोठ्या मेंदूमुळे वाढतो कॅन्सरचा धोका!

मोठ्या आकाराच्या मेंदूमुळे मेंदूचा कॅन्सर होण्याची शक्यता वाढते, असा शोध संशोधकांनी लावला आहे. मोठ्या आकाराच्या मेंदूमध्ये पेशींची संख्याही अधिक असते. यामुळे पेशींच्या विभागणीचं प्रमाणही अधिक असतं. अॅग्रेसिव्ह ब्रेन कॅन्सर हा अत्यंत दुर्मीळ असा विकार आहे. पण हा विकार झाल्यानंतर रूग्ण वाचण्याची शक्यता अगदी कमी असते. कॅन्सर होण्याला शरीरातल्या विविध अवयवांचा आकारही तितकाच कारणीभूत ठरत असल्याचं विविध संशोधनांमधून समोर आलं आहे. स्तनांच्या मोठ्या आकारामुळे महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सरचा धोका वाढतो. मेंदूच्या बाबतीतही असंच घडतं का, हे जाणून घेण्यासाठी हे संशोधन करण्यात आलं.

|| डोळ्यांचं आरोग्य ||

## जपा डोळ्यांलगतची नाजूक त्वचा

डोळ्यांलगतची त्वचा खूप नाजूक असते. चेहऱ्याच्या इतर भागावरच्या त्वचेच्या तुलनेत ही त्वचा दहापटींनी पातळ असते. त्यामुळे या त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते. या त्वचेसाठी वापरण्यात येणाऱ्या उत्पादनांचा डोळ्यांवरही परिणाम होत असतो. त्यामुळे डोळ्यांलगतच्या त्वचेवर वापरण्यासाठी खास तयार करण्यात आलेल्या उत्पादनांचा वापर करा. या त्वचेवर सौम्य स्वरूपाचे साबण आणि फेसवॉश वापरा. आयमास्कचा वापर करा. डोळ्यांच्या सुरक्षिततेसाठी गॉगलचा वापर करा. डोळे चोळू नका.

|| दंतारोग्य ||

## गरोदरपणातल्या दंतसमस्या

गरोदरपणात महिलांनी दातांची आणि तोंडाच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्यायला हवी. जंतू आणि जंतूसंसर्ग शरीराच्या कोणत्याही भागातून गर्भाशयापर्यंत पसरू शकतो. दात आणि हिरड्यांचा जंतूसंसर्गही याला अपवाद नाही. गरोदरपणात दातांशी संबंधित समस्या उद्‌भवू शकतात. हार्मोन्समध्ये झालेल्या बदलांमुळे हिरड्यांमधून रक्त येणं तसंच प्लाकशी संबधित जंतूसंसर्ग होऊशकतो. गरोदरपणाच्या पहिल्या तीन महिन्यांच्या काळात दातांमध्ये ट्यूमर होण्याची शक्यता असते. त्यामुळे गरोदरपणात आपल्या शरीराकडे लक्ष देताना दातांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

|| आजीबाईंचा बटवा ||

## लाभ कच्च्या पपईचे

पिकलेल्या पपयांची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. पिकलेल्या पपईप्रमाणे कच्च्या पपईचे अनेक उपयोग आहेत. कच्च्या पपईच्या सेवनाने पचनशक्ती सुधारते. प्रथिनांचं रूपांतर अमिनो आम्लात करण्यात कच्च्या पपईची मदत होते. बद्धकोष्टतेची समस्या कच्च्या पपईमुळे दूर होऊ शकते. इतकंच नाही, तर आतड्याच्या नैसर्गिक स्वच्छतेसाठी कच्च्या पपईचं सेवन करायला हवं. सर्दी, खोकला, जंतूसंसर्ग यावरही कच्ची पपई गुणकारी आहे. मळमळत असेल तर कच्ची पपई खायला हवी. एकंदरीत, गुणांची खाण असलेल्या कच्च्या पपईचा समावेश आहारात करायला हवा.